। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक २४ वा । शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अर्ध्यातोळ्याच्या दागिण्याची चोरी: गुन्हा दाखल

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दशरथ अनंता मदणे, वय ३२ वर्षे, रा. काटी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.०१.०२.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन रोख रक्कम ४०,००० सोन्याची अर्ध्या तोळ्याची सोन्याचे दागिने एकुण ६०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- दशरथ मदणे यांनी दि.२५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (३), ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सतिश राम घाडगे, वय ३८ वर्षे, रा. पांढरे प्लॉटींग लोहारा बु ता. लोहारा जि. धाराशिव यांची अंदाजे ७०,००० किंमतीची मोटरसायकल भारतीबुवा मठाचे पार्कींग तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सतिश घाडगे यांनी दि.२५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शेतकऱ्याच्या मोटारीची कॉपर, केबल आदिची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२४.०३.२०२६ रोजी अणदुर ता. तुळजापूर तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखरकारखाना प्रा. लि. नळदुर्ग अणुदर लंगडे साठवण तलावरील ११ शेतकऱ्याचे पाण्याचे मोटारीचे कॉपर केबल, तुळजापूर तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखरकारखाना प्रा. लि. नळदुर्ग संचलित गोकुळ शुगर युनिट नं ०२ येथील एक सिमेंन्स कंपनीची ०३.५ एच पी.ची इलेक्ट्रीक मोटार, लोखंडी बॉल व लोखंडी पट्या, एक हिरो होंडा सी.डी.डॉन कंपनीची मोटरसायकल कृर एमएच १३ वाय १०३० असे एकुण८६,५००किंमतीचा माल यशवंत रा. चिकुंद्रा ता. तुळजापूर, विशाल, तुळशीराम दोघे नळदुर्ग ता. तुळजापूर यांनी चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फफलचंद साबळे यांनी दि.२५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी ‘ट्रीपल ड्रग थेरपी’ (आयडीए) मोहिमेला वेग-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी ‘ट्रीपल ड्रग थेरपी’ (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ‘मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन’ (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी ‘ट्रीपल ड्रग थेरपी’ (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, ‘आयडीए’ उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय फिलेरियासिस निर्मूलन शक्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील या आजाराचा प्रादुर्भाव हा नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत.

सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

# ‘बालविवाहाच्या छायेतून शिक्षणाच्या प्रकाशाकडे’ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामुळे दोन उमलत्या कळ्यांना नवे आयुष्य

**धाराशिव (जिमाका):** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारातून दोन निष्पाप मुलींच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण झाला आहे.बालविवाह आणि कौटुंबिक त्रासाच्या विळख्यात अडकलेल्या या मुलींना मुक्त करून त्यांना नव्या आयुष्याची दिशा देण्यात आली आहे.या मुलींची शक्ती सदन येथे रवानगी करण्यात आली असून त्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

धाराशिव तालुक्यातील एका गावातील शालेय शिक्षण घेत असलेल्या मुलीने तिच्या आईने तिच्या व वडिलांच्या इच्छेविरुद्ध लावलेल्या बालविवाहाविरोधात धाडसाने आवाज उठवला. शिक्षण बंद करून मारहाण केली जात असल्याची वेदनादायक कहाणी तिने १३ मार्च २०२६ रोजी सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडे अर्जाद्वारे मांडली.हा अर्ज मिळताच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती अभिश्री देव यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव श्रीमती. भाग्यश्री पाटील यांनी तात्काळ कार्यवाही सुरू केली.

या प्रकरणासाठी बालस्नेही संघातील उपमुख्य न्यायरक्षक ॲड.अभय पाथरूडकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने दोन्ही मुलींची व्यथा समजून घेतली. चौकशीदरम्यान पीडित मुलीने लग्नातील फोटो आणि मारहाणीचे व्हिडिओ सादर केले.मात्र,तिची परीक्षा १८ मार्च रोजी संपत असल्याने पेपर संपल्यावर मी येते, असे तिने सांगितले.शिक्षणाविषयीची तिची जिद्द यामधून स्पष्ट झाली.

१८ मार्च २०२६ रोजी पीडिता तिच्या लहान बहिणी व वडिलांसह जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे आली. त्या वेळी दोन्ही बहिणी भीती आणि तणावाखाली होत्या.त्यांनी घरी परतण्यास नकार दिल्यानंतर तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर संपर्क साधण्यात आला. त्यानंतर जिल्हा महिला बालविकास चाइल्ड लाईनचे अमर भोसले,पुनम पाटील, श्री.चव्हाण तसेच सखी वन स्टॉप सेंटरच्या प्रतिनिधी प्रियंका जाधव व एक महिला प्रतिनिधी घटनास्थळी दाखल झाले. पीडित मुलींशी सविस्तर चर्चा केल्यानंतर त्यांना बालकल्याण समिती सदस्य ॲड.दिपाली जहागिरदार यांच्या समोर हजर करण्यात आले. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन बालकल्याण समितीने दोन्ही मुलींना शक्ती सदन,बालाजी नगर,शेकापूर रोड,धाराशिव येथे पाठविण्याचा आदेश दिला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या या संवेदनशील आणि तत्पर हस्तक्षेपामुळे दोन अज्ञान मुलींना त्रासातून मुक्तता मिळाली आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटक आणि अज्ञान बालकांना कोणतीही अडचण अथवा तक्रार असल्यास त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय,धाराशिव यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी केले आहे.

## महिला सक्षमीकरणाचा उत्सव : तीन दिवसीय नवतेजस्विनी महोत्सव

**धाराशिव (जिमाका)** : महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत २७ ते २९ मार्च २०२६ दरम्यान धाराशिव क्लब मैदान,शहर पोलीस स्टेशनजवळ,धाराशिव येथे नवतेजस्विनी महोत्सव चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन २७ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हाधिकारी श्री.किर्ती किरण पूजार यांच्या हस्ते होणार आहे.या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वयंसहाय्य महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंचे जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री तसेच महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात जिल्ह्यातील विविध प्रकारचे सुमारे ४० स्टॉल सहभागी होणार असून,गावरान धान्य,कडधान्य,राजमा, तूप,अंडी,वर्मी कंपोस्ट खत,दुग्धजन्य पदार्थ,मसाले,पापड,कुरडई,शेवय्या, मनुके,शोभेच्या वस्तू,मूर्ती,फ्लॉवर पॉट, रेडीमेड कपडे आदी विविध उत्पादनांचा समावेश असणार आहे.या माध्यमातून महिला बचतगटांना आपल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.तसेच या तीन दिवसांच्या महोत्सवात विविध सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम, महिलांच्या आरोग्य व सकस आहार विषयक चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत.याशिवाय माविम मित्र व उत्कृष्ट बचतगटांचा सन्मान सोहळाही पार पडणार आहे. या नवतेजस्विनी महोत्सव मध्ये जिल्ह्यातील तसेच शहरातील सर्व नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून महिला सक्षमीकरणासाठी सहकार्य करावे,असे आवाहन श्री.सुखदेव चिंचोलीकर,जिल्हा समन्वय अधिकारी,महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांनी केले आहे.

## अचूक जनगणनेसाठी सजग राहून काम करा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण सत्र सुरू



**लातुर/प्रतिनिधी** : ज्याप्रमाणे निवडणुकांचे आयोजन महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे जनगणना ही प्रक्रिया देखील देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मूल्यमापन करणाऱ्या या प्रक्रियेतूनच देशाच्या विकासाचा खरा रोडमॅप तयार होतो. त्यामुळे जनगणनेच्या कामात सर्वांनी सजग राहून, अचूक नियोजन करावे आणि कोणतीही दिरंगाई करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले.

भारताची जनगणना २०२७ अंतर्गत तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांच्या दुसऱ्या टप्प्यातील तीन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. या सत्राच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रशिक्षण सत्राला जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले, मिलिंद पाटील, लातूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा जनगणना समन्वयक विठ्ठल परब यांच्यासह जिल्ह्यातील २३ चार्ज अधिकारी आणि १०६ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ते देशाचे सामाजिक आणि आर्थिक प्रतिबिंब आहे. प्रत्येक घर आणि प्रत्येक कुटुंब जनगणनेत समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी. प्रगणकांनी अचूक काम करावे यासाठी त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रगणकांनी लोकांशी संवाद साधताना सकारात्मक राहावे, जेणेकरून जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढेल. सर्व चार्ज अधिकारी आणि प्रशिक्षणार्थींनी आपापसात समन्वय ठेवून हे काम यशस्वी करावे. दहा वर्षांनंतर येणारी ही जनगणनेची प्रक्रिया देशसेवेची एक मोठी संधी आहे. प्रशिक्षणातील सूक्ष्म गोष्टी समजून घ्या आणि कोणतीही समस्या असल्यास त्याचे वेळीच निरसन करून घ्या. या कामात कसलाही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले यांनी उपस्थितांना तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना कायदा, चार्ज अधिकारी यांची वैयक्तिक जबाबदारी, घरांची निवड, इमारतींना क्रमांक देण्याची पद्धत आणि जनगणनेतील विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली.




ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## खरातला वेळीच रोखायाची जबाबदारी कोणाची होती?

समाजामध्ये अनेक अप्रिय घटना घडत असतात. बऱ्याच वेळा दुर्लक्ष केले जाते किंवा जाणून-बुजून अप्रिय घटना घडविल्या जातात. सर्व बाबीकडे सरकारनेच लक्ष द्यावे असे विचार समोर येतात. सरकारला मर्यादा येतात. ते तरी कोठे-कोठ लक्ष देईल, मग जबाबदारी नागरिकांची येते. देशातील जबाबदार नागरिक म्हणून आपली काही जबाबदारी पुर्ण करणे आवश्यक असते, याचा विचार आता यापुढे करावाच लागणार आहे. वस्तविक खरात याला पोसणारे सर्वजनच आहेत असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. कोणाला नावे ठेवणेही योग्य नाही. वास्तविक ज्या बाबी विज्ञानाला धरून असतात त्या भोंदूकडून सिद्ध होत नाहीत. आज जे ईस्त्राईल व इराण दरम्यान युद्ध चालू आहे. येथे केवळ सायन्सचा उपयोग करून घेतला जात आहे. सर्व यंत्रणा ही विज्ञानावर आधारित आहे. मिसाईल असो किंवा हवाई अचूक हल्ले हे विज्ञानाची साथ, संशोधनाद्वारे होत आहेत. येथे मिरच्या, लिंबू, जोडे, काळादोरा, विचित्र फोटो लावले जात नाहीत. लिंबू-दोर-गंड्यावर जर चालले असते तर विज्ञानाची गरज भासली नसती. खरात प्रकरण म्हणजे एका अंधश्रद्धेला बळी पडलेली मंडळी आहेत. लोकांना फसविणारे काही ठराविक लोक असतात. खरात दहावी नापास तो जर अमाप संपत्ती कमावित असेल, महिलांना वेड्यात काढत असेल. ज्या महिला बळी पडल्या आहेत त्यांचे कुटुंबिय अज्ञानी असेल असे वाटणे स्वाभाविक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आमोश्याच्यारात्रीच अनेक किल्ले जिंकले आहेत. याचा अर्थ दिवस, रात्र, महिणा किंवा वर्ष हे अशुभ नाहीत. प्रत्येक दिवसानंतर रात्र नंतर दिवस उगवत असतो. सत्य बाबी असताना भोळी जनता भोंदूच्या जाळ्यात आडकत, आयुष्य बरबाद करतात. राज्यात काय देशात अनेक भोंदू मंडळी होवून गेली. बुवाबाजी करणारे जेलमध्ये आडकले आहे. श्रद्धा व अंधश्रद्धा यात मोठा फरक आहे. श्रद्धा असावी. हा भाव आहे. अंधश्रद्धा विनाशाकडे घेवून जाणारी आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. ज्या-ज्यावेळी युद्ध लढले त्यावेळी पांचांग पाहून नाही. शोध लावले ते प्रयोगाने लावले पांचांग पाहून नाही. हे लक्षात घ्यावे. देशाने मोठी प्रगती केली. अनेक ग्रहावर जावून शोध घेतला जात आहेत. संशोधन चालू आहे. विज्ञान हे भाकित नाही तर ठोस असा उपाय आहे. विज्ञानाने मोठमोठे शोध लावले आहेत. मोबाईल, टिव्ही, मिसाईल, इंटरनेट आदि विज्ञानाने प्रगती केली आहे. भोंदू बाबाने नाही. अनेक शोध भारतीयांनी पुर्वीच लावले आहेत नंतर त्यात संशोधन झाले आहे. तरी भोंदूबाबाला बळी का पडतात असा प्रश्न समोर येणे स्वाभाविक आहे. भोंदू व त्याचे चेले असतात ते फसवितात. मोबाईलने अनेक प्रगती केली आहे. त्यात बरेच सामावले आहे. सचित्र हजारोकिमी पासून चित्रासह बोलता येते. असा चमत्कार भोंदू करतो का? नाही. मुळात जसे कलाकार असतात तसे भोंदू हे कलाकार आहेत. आपल्या कलेचा उपयोग जनतेला फसविण्यासाठी केला जातो. हे उघड आहे. जनतेनी समजावुन घेतले पाहिजे. दिवस उजडायाला रोखता येते का? कोणत्याही बाबानी ते करून दाखववे. शक्य नाही. दिवस उजडणार व मावळणार! हे चक्र कोणीही थांबवू शकत नाही. मुळात लोक फसतात कारण ते अज्ञानी आहेत. शिकलेले असले तरी ते विचारी नाहीत. अविचाराने वागल्याने भोंदूबाबाचे चालते. मुळात मुल न होणे या शरिरातील दोषामुळे समस्या निर्माण होते. भोंदू काही करू शकत नाहीत. त्याच्या हाती काहीच नसते. जीव जेंव्हा जन्माला येतो त्यानंतर जीवनात घडामोडी घडत असतात. खरात हा पहिलाच भोंदू नाही यापुर्वी अनेक भोंदू झाले आहेत, त्यांच्यापासून सावध झालो आहोत तरी पुन्हा बळी पडतो ही बाब योग्य नाही. मुळात भोंदूगिरी अनेक काळ चालत नाही. ती लवकरच उघडी पडते. ती सत्य नसते असत्य असते, असत्य दिर्घ काळ टिकू शकत नाही हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे खरात याने जे मायाजल निर्माण केले त्यात फसले गेले आहेत. यावर मात कशाप्रकारे करावयाची झाली तर प्रत्येकांनी विचारपुर्वक चालले पाहिजे. अनेकांनी सत्य काय आहे. असत्य काय आहे हे ओळखले पाहिजे. यासाठी ईश्वराने मानवाला सर्वाधिक बुद्धी दिली आहे. माणुस सर्वात हुशार आहे, पशुपक्षीपेक्षा हुशार आहे. पशुपक्षी वेळवर घरट्यात येतात. वेळेवर झोपतात. वेळीवर सुर्यादयहोण्याच्या अगोदर उठतात. त्यांचे घरटे पाण्या व वाऱ्यापासून तग धरू शकते. ते काही सिव्हील इंजिनिअर नसताना ते पक्के घरटे बांधतात. माणूस विचारी आहे तरी तो भोंदूबाबाकडे जावून फसतो. विचार करीत नाही. डॉक्टरकडे गेल्यास उपचार होवू शकतो. भोंदूकडे गेल्यास लुट होते. अब्रु लुटली जाते हे तसे कोणालाही सांगण्याची गरज नाही सर्वांना माहिती आहे. खरताने ओळखले की, जनता मुर्ख आहे आपण सहज आणखिन मुर्ख बनवू शकतोत. त्यानुसार त्याने षडयंत्र रचले त्यात ते यशस्वी झाले. मुळात चुकीच्या मार्गावर अधिक काळ चालता येवू शकत नाही. चुकीचा मार्ग हा अयोग्य असतो हे कळते, तरी मोहापायी आडकत जात असतो. त्यामुळे नागरिकांनी सावध होवून वागले पाहिजे. नागरिकांनी योग्य काय, अयोग्य काय आहे हे ओळखले पाहिजे. खरात याच्या नादाला लागून काय साध्य झाले. याचा विचार केला पाहिजे. हे प्रकरण उघडे पडले. त्यामुळे जनता सावध झाली. खरातचे कारनामे कळाले. सरकारने लक्ष घातल्याने सर्व बाबी उघड्या पडत आहेत. भावनेपोटी आलेल्यावर अत्याचार करणे योग्य नाही. पैसा कमविण्यासाठी अनेक मार्ग आहेत. अत्याचार करून फसवणुक करणे योग्य नाही. राज्याचे मुख्यमंत्री अभ्यासू आहेत. अंधश्रद्धेला थारा देत नाहीत, त्यात त्यांना पोलिस अधिकाऱ्याची साथ दिल्याने तातडीने प्रकरण उघडे पडले. अनेक बाबी समोर आल्या. गुन्हा दाखल झाल्यानंतर अनेकजन समोर येत आहेत. आता कसोटी सरकार पक्षाची आहे. सरकारकडून तो कोणत्याही परिस्थितीत सुटणार नाही. पळवाट सापडू न देणे हे महत्वाचे आहे. त्याला कशी कायद्याने अद्दल घडविता येईल या बाबत विचार करून त्याची मस्ती जिरविण्याचे काम केले पाहिजे. जनतेनी सुद्धा विज्ञानाची साथ घ्यावी, विचाराने निर्णय घ्यावा. चुकीच्या मार्गाने वागू नये. चुकीच्याबाबीमुळे घात होवू शकतो हे या वरून लक्षात घेवून चालले पाहिजे.खरात सारख्याना वेळीच रोखण्याची नागरिक म्हणून जबाबदारी स्विकारणे योग्य आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जागतिक क्षयरोग दिन विविध जनजागृती उपक्रमांसह साजरा

## क्षयरोग-मुक्त भारत' निर्मितीच्या संकल्पाचा पुनरुच्चार



**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २४ मार्च २०२६ रोजी 'जागतिक क्षयरोग दिन' सोलापूर येथील डॉ. कोटणीस स्मृती विभागीय रेल्वे रुग्णालय आणि वाडी येथील पॉलीक्लिनिकमध्ये विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा केला. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या राष्ट्रीय प्रयत्नांना पूरक ठरेल अशा प्रकारे, लाभार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना क्षयरोगाविषयी (ढइ) लक्षणे, प्रतिबंध, वेळेवर निदान आणि प्रभावी उपचार जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित असलेल्या देगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (झकउ) वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली महिंद्रकर यांनी एक अत्यंत माहितीपूर्ण आणि ओघवते व्याख्यान दिले. त्यांनी क्षयरोगाची कारणे, लक्षणे आणि तो पसरण्याची माध्यमे कोणती आहेत ? यांविषयी सविस्तर माहिती दिली; तसेच, पूर्णपणे बरे होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, रोगाचे लवकर निदान आणि डॉक्टरांनी सुचवलेल्या उपचार पद्धतीचे काटेकोर पालन करणे किती महत्त्वाचे आहे, यावर विशेष भर दिला.

उपस्थितांना संबोधित करताना, सोलापूर विभागाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक (उचड) डॉ. मंजुनाथ जी. एस. यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण राष्ट्रीय प्रयत्नांवर प्रकाश टाकला. तसेच, 'क्षयरोग-मुक्त भारत' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक आणि समाजाचा सक्रिय सहभाग किती निर्णायक ठरतो, यावर त्यांनी भर दिला. त्यांनी लाभार्थ्यांना आरोग्यदायी सवयी अंगीकारण्यासाठी आणि या आजाराशी संबंधित सामाजिक कलंक कमी करण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी प्रोत्साहित केले.

वाडी येथील पॉलीक्लिनिकमध्येही विभागीय वैद्यकीय अधिकारी डॉ. रघुनंदन आणि डॉ. श्रवण यांनी अशाच प्रकारचे एक जनजागृती सत्र आयोजित केले; ज्यामुळे या विभागातील रेल्वे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा हा उपक्रम अधिक व्यापक झाला.

एकूण मिळून, या सत्रांमध्ये सुमारे १३० लाभार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला; जो समाजाचा या उपक्रमाला असलेला भक्कम प्रतिसाद आणि वाढती जागृती दर्शवतो.

सोलापूर विभागाने साजरा केलेला 'जागतिक क्षयरोग दिन' हा उपस्थितांचा उत्साहपूर्ण सहभाग आणि माहितीचे अर्थपूर्ण आदानप्रदान यामुळे विशेष ठरला. या निमित्ताने भारतीय रेल्वेची जनआरोग्याप्रती असलेली कटिबद्धता आणि क्षयरोग निर्मूलनाच्या राष्ट्रीय मोहिमेला पाठिंबा देण्यात असलेली तिची सक्रिय भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या युवातरंग वार्षिक स्नेहसंमेलनाची जल्लोषात सांगता

## तरूणाईंचा कलाविष्कार, कलेचा उत्सव, जल्लोष अन् बक्षीस वितरण




**लातूर/प्रतिनिधी** :येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या दि.२४ ते २५ मार्च २०२६ या दरम्यान दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आलेल्या युवातरंग वार्षिक स्नेहसंमेलन-२०२६ ची मोठ्या आनंदमय वातावरणात सांगता झाली.सदरील वार्षिक स्नेहसंमेलनात आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी विविधांगी खाद्यपदार्थाचे स्टॉल्स उभारले होते, यातून त्यांना व्यवसायिकतेचे प्रत्यक्ष धडेही मिळाले.वार्षिक स्नेहसंमेलन हे केवळ कलावंत घडविणारे व्यासपीठ नव्हते तर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या अनुभवांची अनमोल शिदोरी होती.संगीत व साधे शेलापागोट्याच्या माध्यमातून तरूणाईंमधील आनंद,उत्साह दिसून आला. विद्यार्थ्यांनी केलेली रंगीबेरंगी पोशाखाची झगमगाट,रंगीबेरंगी फेट्यांचा साज,सुरूची भोजनाचा आस्वाद, मराठी, हिंदी गाण्याच्या बोलावर थिरकणारी तरूणाईंची पावलं या सर्वांच्या माध्यमातून तरुणाईचा उत्साह दिसून आला.

दयानंद विज्ञान महाविद्यालय हे केवळ शास्त्रज्ञ घडविणारे महाविद्यालय नाही तर सर्वगुण संपन्न,सक्षम विद्यार्थी घडविणारे आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी शैक्षणिक क्रांती घडविणारे आदर्शवत व प्रेरणादायी व्यासपीठ आहे. झिंग झिंग झिंगाट , ढोलकीच्या तालावर घुंगराच्या बोलावर , मला पिरतिच्या झुल्यात झुलवा अन् राया मला इष्काचा गुलकंद खिलवा '','' असं वाजवा की रात गाजवा की आवसची पुनव होऊद्या '',सोडा सोडा राया नाद खुळा, चंद्रा, शांताबाई , पाटलांचा बैलगाडा, अहो शेठ लई दिसानी झालीया भेट, कोंबडी पळाली, बाई वाड्यावर या अशा अनेक अस्सल ठसकेबाज बहारदार लावणीच्या व मराठी, हिंदी रिमिक्स गाण्यांच्या बोलावर तरूणाईं तल्लीन झाली होती.

कला व कलाकारांना दाद देत कलेचा आस्वाद तरणाईंनी घेतला.याचबरोबर विद्यार्थी कल्याण मंडळाबरोबर साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून निबंध,वक्तृत्व,पोस्टर पेंटिग,मेहंदी,रांगोळी, गीतगायन, सिनेमॅटिक रिल शुट स्पर्धा, लोगो स्पर्धा, बॉलीवूड कॅरेक्टर स्पर्धा,वैयक्तिक नृत्य,समूह नृत्य अशा विविधांगी स्पर्धांही घेण्यात आल्या. उदघाटनप्रसंगी काही विद्यार्थ्यांना सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते प्रशांत दामले, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व इतर मान्यवरांच्या हस्ते साहित्य,संगीत,कला,विज्ञान,

क्रीडा,एनएसएस,एनसीसी, इयत्ता ११ वी व १२ वी आणि गुणवंत अशा क्षेत्रातील तसेच स्नेहसंमेलन समारोपप्रसंगीही विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम पारितोषिक,प्रमाणपत्र व बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

सदरील वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, विद्यार्थी विकास मंडळ प्रभारी प्राध्यापक व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,सांस्कृतिक विभाग प्रभारी प्रा.मेघा पंडित,सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, डॉ.कोमल गोमारे, प्रा. बळवंत सूर्यवंशी, प्रा. भालचंद्र कोयलवार, प्रा.विजयकुमार मांदळे, विद्यार्थी सचिव पर्णवी ढवारे,विद्यार्थी प्रतिनिधी ऋतुजा उगिले, सरीना शेख,वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,विविध कमिटींचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी या सर्वांच्या अथक परिश्रमातून वार्षिक स्नेहसंमेलनाची यशस्वीरित्या सांगता झाली.

### शरीरात कॅल्शियमची कमतरता असल्यास जाणवतात ही लक्षणे; वेळीच काळजी घेतली नाही तर ठरू शकते घातक

मानवी शरीर निरोगी ठेवण्यासाठी कॅल्शियम अत्यंत आवश्यक आहे. लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील लोकांसाठी कॅल्शियम महत्त्वाचा आहे. हाडे




मजबूत ठेवणे, हृदयासह स्नायूंचे आकुंचन नियंत्रित करणे, मजबूत दात किंवा निरोगी मज्जासंस्थेसाठी कॅल्शियम आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, कॅल्शियम हार्मोन उत्पादन, पेशी सिग्नलिंग आणि एंजाइमच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सौम्य कॅल्शियमच्या कमतरतेमुळे थकवा किंवा अस्वस्थता जाणवू शकतो, तर दीर्घकालीन आणि तीव्र कम तरतेमुळे गंभीर न्यूरोलॉजिकल आणि हृदयरोगच्या समस्या उद्भवू शकतात.

नवीन संशोधनातून असं दिसून आलं आहे की, कॅल्शियमच्या कमतरतेची सुरुवातीची लक्षणे बहुतेकदा सौम्य आणि अस्पष्ट असू शकतात. त्यांना सहजपणे ताण, वृद्धत्व किंवा थकवा समजले जाऊ शकते. म्हणूनच, परिस्थिती बिघडण्यापूर्वी तात्काळ मदत घेणे गरजेचं आहे. या लेखात, आपण कॅल्शियमच्या कमतरतेच्या लक्षणांवर चर्चा करू. तज्ञ म्हणतात की जेव्हा कॅल्शियमची पातळी कमी होते तेव्हा काही लक्षणे स्पष्ट दिसातात.

कॅल्शियम शरीरासाठी आवश्यक: नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या मते, कॅल्शियमची कमतरता, ज्याला हायपोकॅल्सेमिया असंही म्हणतात, ही अशी स्थिती आहे, जी रक्तात कॅल्शियमची पातळी पुरेशी नसल्यास उद्भवते. कॅल्शियम हे एक आवश्यक खनिज आहे. जे हाडांचे आरोग्य, स्नायूंचे आकुंचन आणि मज्जातंतूंचे संक्रमण यासारख्या अनेक शारीरिक प्रक्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. पुरेसे कॅल्शियम न मिळाल्याने स्नायूंमध्ये पेटके येणे, मूड बदलणे आणि कोरडी त्वचा किंवा केस गळणे यासारखी लक्षणे दिसू शकतात.

संशोधनाचा अंदाज आहे की, जगभरात ३.५ अब्जाहून अधिक लोक कॅल्शियमच्या कमतरतेने ग्रस्त आहेत किंवा त्यांना कॅल्शियमची पातळी कमी होण्याचा धोका आहे. कॅल्शियमच्या कमतरतेची लक्षणे व्यक्तीनुसार बदलू शकतात. काही लोकांना हायपोकॅल्सेमियाची लक्षणे अचानक जाणवू शकतात, तर काहींमध्ये ही लक्षणं कालांतराने दिसू शकतात. बहुतेकदा कॅल्शियमच्या कमतरतेची लक्षणं मूळ कारणावर आणि तीव्रतेवर अवलंबून असतात.

हायपोकॅल्सेमिया (कॅल्शियमची कमतरता ) ची लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

पेटके: स्नायूंमध्ये वेदना, ज्यामध्ये हालचाल करताना मांड्या आणि हातांमध्ये वेदनांचा समावेश आहे. यामध्ये हात, पाय आणि बोटे तसंच तोंडाभोवती सुन्नपणा आणि मुंग्या येणे देखील समाविष्ट असू शकते. स्नायूंच्या कार्यासाठी कॅल्शियम महत्वाचे आहे. तज्ञांचं म्हणणं आहे की, जर कॅल्शियमची पातळी कमी असेल तर स्नायू योग्यरित्या कार्य करणार नाहीत. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे पाय आणि हातांमधील स्नायू केवळ क्रियाकलापादरम्यानच नव्हे तर विश्रांतीच्या वेळी देखील सुस्त आणि सुन्न वाटतात असं म्हटलं जातं.

खूप थकवा जाणवणे: कमी कॅल्शियम पातळीमुळे तीव्र थकवा येऊ शकतो, ज्यामध्ये उर्जेचा अभाव आणि आळसाची भावना यांचा समावेश आहे. यामुळे निद्रानाशाच्या समस्येचा देखील सामना करावा लागू शकतो. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे चक्कर येणे, विसरणे आणि गोंधळ होण्याचा धोका देखील वाढू शकतो.

ठिसूळ नखे: नखांमुळे आपल्या आरोग्याचे संकेत मिळतात. तज्ञांचं म्हणणं आहे की, नखांचा वापर कॅल्शियमची पातळी निश्चित करण्यासाठी केला जाऊ शकतो. असं म्हटलं जातं की, जर शरीरात कॅल्शियमची कमतरता असल्यास नखे ठिसूळ होतात आणि टोकं तुटू लागतात.

दात किडणे किंवा दातांचे नुकसान: कॅल्शियम हा दातांच्या मुलामा चढवण्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. जर पुरेसे कॅल्शियम नसेल तर मुलामा चढवणे कमकुवत होते, ज्यामुळे दात किडणे आणि लवकर दात गळणे यासारख्या समस्या उद्भवतात, असा इशारा तज्ञ देतात. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे केस तुटू शकतात आणि तुकड्यात गळू शकतात. एक्झिमा, त्वचेची जळजळ आणि खाज सुटणे किंवा कोरडे ठिपके येऊ शकतात.

पार्किन्सन रोग: तज्ञांचं म्हणणं आहे की, जेव्हा शरीरात पुरेसे कॅल्शियम नसते तेव्हा पार्किन्सन रोग होतो. न्यूरोलॉजी जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या २०१९ च्या एका अभ्यासात असं आढळून आलं की, कॅल्शियमची कमतरता असलेल्या लोकांना पार्किन्सन रोग होण्याचा धोका जास्त असतो. बोस्टनमधील ब्रिघम आणि महिला रुग्णालयात काम करणाऱ्या डॉ. अलेक्झांड्रा सी. गोन्काल्व्हस यांनी या संशोधनात भाग घेतला. त्यांना असं आढळून आलं की, कॅल्शियमची कमतरता असलेल्या लोकांना पार्किन्सन रोग होण्याचा धोका जास्त असतो. संधिवात: मजबूत, निरोगी हाडांसाठी कॅल्शियम अत्यंत आवश्यक आहे. असे म्हटले जाते की दीर्घकाळ कॅल्शियमची कमतरता हाडे कमकुवत करू शकते, ज्यामुळे संधिवात सारख्या आजारांना जन्म होऊ शकतो. हृदय गती: कॅल्शियममध्ये हृदय गती नियंत्रित करणाऱ्या विद्युत आवेगांचे नियमन करण्याची शक्ती असते. तज्ञांचं म्हणणं आहे की, कॅल्शियमच्या कमी पातळीमुळे हृदयाच्या लयीत अडथळा येऊ शकतो, ज्याला कार्डियाक ॲहरिथमिया म्हणतात. हृदय गती वाढणे, अनियमित हृदयाचे ठोके आणि सौम्य छातीत दुखणे ही याची लक्षणे आहेत. कॅल्शियमसाठी काय खावे? तज्ञ म्हणतात की, कॅल्शियम मिळविण्यासाठी, तुम्ही दररोज काही विशिष्ट पदार्थ खावेत. विशेषत: दूध, दही, चीज आणि हिरव्या भाज्या जसे की सॅलड आणि केळ, बदाम, सोया उत्पादने, टोफू आणि चीज यांचा यात समावेश आहे. सॅल्मन आणि सार्डिनसारखे मासे देखील खावेत, असे तज्ञ सांगतात.

# शेअर बाजारात घसरण: अनिश्चिततेची छाया

शेअर बाजार घसरणे किंवा वर जाणे फार महत्त्वाचे नाही. उद्योगांना युद्धाचा फटका बसल्याने बेरोजगारी वाढेल, जनतेचे उत्पन्न घटेल व महागाई वाढेल. त्यावर सरकारकडे काय उपाय आहेत?

पश्चिम आशियातील युद्धाचा भारतावर प्रतिकूल परिणाम झाला आहे हे नक्की. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा व राज्यसभेत जे निवेदन केले त्यावरून ही बाब अधिक स्पष्ट होते. कोरोना काळास ज्या प्रमाणे देशाने धैर्याने तोंड दिले त्याचप्रमाणे या संकटाचाही सामना देशातील जनतेने ऐक्य राखून करावा असे आवाहन मोदी यांनी केले. हे संकट बराच काळ रेंगाळेल हे त्यांना मान्य करावे लागले आहे. देशाच्या इंधनाच्या गरजेपैकी पश्चिम आशियातून मोठा भाग येतो आणि त्याच मार्गाने तो येतो हे मोदी यांनी सांगितले आणि तो मार्ग-होर्मुझची सामुद्रधुनी-बंद झाल्याने इंधनाच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्याचेही त्यांना सांगावे लागले. या पेच प्रसंगाला तोंड देण्यासाठी सरकार काय करत आहे हे मोदी यांनी सविस्तररीत्या सांगितले. मात्र गेल्या चार आठवड्यात त्याचा काय उपयोग झाला हे सरकारला सांगता आलेले नाही. आखाती प्रदेशात अडकलेल्या तीन लाख जणांना परत आणण्यात आले असे ते म्हणाले. मात्र त्यातील बहुतेकजण पर्यटक होते, जे भारतीय आखाती प्रदेशात नोकरी-व्यवसाय करतात त्यांचा प्रश्न सुटला की नाही ते कळलेले नाही.देशात स्वयंपाकाचा गॅस, वाहनांचे इंधन यांचा पुरेसा साठा



आहे असे ते म्हणाले. पण मग नागरिकांनी पर्यायी इंधनांचा वापर करावा असे सरकारने अलिकडे का सुचवले?मुत्सद्देगिरी अपयशी?

पश्चिम आशियात युद्ध सुरु झाल्यावर जेमतेम चार-पाच दिवसांतच केंद्र सरकारने स्वयंपाकाच्या गॅसची-एलपीजी-आणि औद्योगिक वापराच्या इंधनाची किंमत वाढवली.त्यांच्या वाहतूक करणार्या जहाज कंपन्यांनी दर वाढवल्याने त्याचा बोजा ग्राहकांवर टाकणे सरकारला भाग पडले असे म्हणावे लागेल पण तसे मोदी यांनी आपल्या भाषणात सांगितले नाही. खनिज तेलाचा सुमारे ४५ दिवस पुरेल एवढा साठा असल्याचे सरकारने आधी सांगितले होते; तसे असेल तर देशांतर्गत एलपीजीचे पुरेसे उत्पादन होणे अपेक्षित होते. पेट्रोलियम क्षेत्रातील खासगी कंपन्यांनाही एलपीजीचे उत्पादन वाढवण्यास सरकारने सांगितले होते. पण तसे झालेले नसावे. इस्रायलच्या दौर्यावरून मोदी परतल्यावर दोनच दिवसांनी इस्रायलने इराणवर हल्ला केला. मोदी गेल्यावर कारवाईची संधी मिळाली अशा आशयाचे विधान भारतातील इस्रायली राजदूताने केले होते. पश्चिम आशियातील स्थितीची कल्पना भारतास आली नाही, भारतीय गुप्तचरांना इस्रायलच्या योजनेचा सुगावा लागला नाही असा त्याचा अर्थ होतो. इराण व इस्रायल दोघांशीही भारताचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. मात्र मोदी यांनी इस्रायलशी, विशेषत: संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर भर दिला आहे. इस्लामी देशांवर इस्रायल हल्ला करत असल्याने संघ परिवारास तो जवळचा वाटतो. अनेक शस्त्रास्त्रे भारत इस्रायलकडून खरेदी करत आहे. ताज्या युद्धात इस्रायलने प्रथम इराणवर हल्ला केला, त्यास अमेरिकेने साथ दिली.होर्मुझची सामुद्रधुनी इराणने नंतर बंद केली. तरीही तेल व वायूच्या साठ्यांवर हल्ले केल्याबद्दल मोदी यांनी इराणवर टीका केली. होर्मुझ बंद करणे स्वीकारार्ह नसल्याचे मत व्यक्त केले. या मुळे इस्रायल व अमेरिकेच्या बाजूने भारत उभा असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पॅलेस्टाईनमध्ये इस्रायलने हजारो निरपराध नागरिकांची कत्तल केली, अमेरिकेने अलिकडे इराणमध्ये शाळकरी मुला-मुलींची हत्या केली; त्याबद्दल मोदी गप्प का आहेत? देशातील धोरणात्मक खनिज तेलाचा साठा केवळ सहा दिवस पुरेल एवढा आहे. तो वाढवण्यासाठी चालू वर्षात ५ हजार ८७६ कोटी रुपयांची तरतूद होती त्या पैकी केवळ १ हजार ३९ कोटी खर्च झाले आहेत. पुढील वर्षासाठी(२६-२७) या साठ्यासाठी २०० कोटी इतकी किरकोळ तरतूद आहे. इंधनाचा पुरेसा साठा आहे असे मोदी कशाच्या आधारे म्हणत आहेत? युद्ध सुरु झाल्यावर आठवडाभरात मोरबी येथील टाईल्स बनवणार्या कंपन्या बंद पडल्या, सूक्ष्म व लघु उद्योगांवर प्रतिकूल परिणाम झाला. युद्धाने देशावर आर्थिक व संकट आले आहे हे नक्की; त्याला जनतेनेच का तोंड द्यावे? सरकारची भूमिका काय आहे?

## पाणी प्यायल्यानेच नियंत्रणात राहणार रक्तदाब! फक्त ही पद्धत फॉलो करा

गेल्या काही वर्षात बहुतांश लोकांना उच्च रक्तदाबाचा त्रास होत आहे. हे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. खराब फिटनेस आणि चुकीची दिनचर्या यामुळे रक्तदाबाची समस्या भेडसावत आहे. या आजाराकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात घातक ठरू शकतं. नुकत्याच झालेल्या संशोधनानुसार, देशातील सुमारे ३० टक्के तरुणांना उच्च रक्तदाबाच्या तक्रारी आहेत आणि त्यामागे खराब जीवनशैली कारणीभूत आहे. दरम्यान, एका तज्ज्ञाने सांगितले आहे की, केवळ पाणी प्यायल्याने उच्च रक्तदाब नियंत्रित केला जाऊ शकतो, परंतु यासाठी एक विशेष पद्धत अवलंबावी लागेल. तुम्हाला रोज किती पाणी प्यावे लागेल? उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी दररोज ८ ग्लास पाणी प्यावे लागते. द मिररच्या वृत्तानुसार, इंग्लंडच्या एमडी डॉ. मोनिका वासरमॅन यांनी सांगितले की, मी नेहमी माझ्या रुग्णाला दररोज ८ ग्लास पाणी पिण्याचा सल्ला देते. रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी पाण्याची कशी मदत होते? डॉ मोनिका वासरमॅन म्हणाल्या, मपाणी शरीरातील अतिरिक्त सोडियम काढून टाकते आणि रक्त डिटॉक्स करण्यास मदत करते.फसोडियममुळे उच्च रक्तदाबाचा धोका वाढतो.



पिण्याच्या पाण्यासोबतच खाण्याचीही काळजी घ्या डॉ मोनिका वासरमॅन यांच्या मते, पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रित राहतो, याचा अर्थ असा नाही की फक्त त्यावर अवलंबून राहावे. यासोबतच जेवणाकडेही लक्ष देणं गरजेचं आहे. असे अनेक पदार्थ आहेत जे रक्तदाब कमी करू शकतात. चरबीयुक्त मासे आणि क्रॅनबेरीचा ज्यूस देखील उच्च रक्तदाब नियंत्रणात आणण्यास मदत करतो.

## इच्छाशक्तीच्या बळावर जगही जिंकता येते

केवळ सव्वा वर्षांची असताना मेंदुज्वरामुळे दृष्टी आणि ऐकण्याची क्षमता गमावलेली एक मुलगी आज जगविख्यात लेखिका म्हणून नावारूपाला आली आहे. तुम्हाला हा चमत्कार वाटत असेल तर, त्याची जनकही हीच मुलगी आहे. हेलेन केलर असे या मुलीचे नाव.

आपल्या केवळ इच्छाशक्तीच्या बळावर तिने आपल्या कठीण मानल्या जाणाऱ्या आजारालाही नियंत्रित केले. ज्या वयात तिचे खेळायचे-बागडायचे दिवस होते, त्या वयात तिच्या पुढ्यात केवळ अंधार होता.



आजारामुळे तिला सुरुवातीला नैराश्य आले होते. तिच्या पालकांनी मग तिची जबाबदारी एनी सुलियन यांच्याकडे सोपवली. अगदी ब्लॅक चित्रपटात अमिताभ ज्या पद्धतीने राणी मुखर्जीला स्पर्शाची भाषा शिकवतो. अगदी त्याच पद्धतीने एनीने हेलेनला स्पर्शाची भाषा शिकवली.यानंतर एनीने तिला भाषा शिकवण्यासाठी जिवाचे रान केले. तिला प्रथम हाताने भाषा शिकवत शब्दांचे अर्थ तिला समजावले.

यानंतर हेलरच्या मनात नवीन उमेद जागी झाली. हेलरने यानंतर कधीही मागे वळून पाहायचेच नाही हे ठाम केले.तिच्यात एक अशी ऊर्जा निर्माण झाली, की या ऊर्जेने तिला नवीन दृष्टी दिली, आणि ही ऊर्जा होती तिच्या इच्छा शक्तीची. या बळाच्या आधारेच तिने रेडक्लिफ महाविद्यालयातून आपली पदवी मिळवली. या दरम्यान हेलेनचे पहिले पुस्तक मद स्टोरी ऑफ लाईफफ प्रकाशित झाले. यानंतर याचे जवळपास ५० भाषांमध्ये या पुस्तकाचे भाषांतर करण्यात आले.इथे हेलन यांच्या केवळ इच्छाशक्तीचाच विजय झाला. त्यांनी बालपणातच जर हार मानली असती तर जगाला इतकी प्रतिभाशाली लेखिका मिळालीच

## हृदय सुरक्षितेसाठी या सवयी अंगीकारा

आधुनिक जीवनशैलीत, कामाचा ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि भविष्याची चिंता यामुळे तणाव प्रत्येक घराचा एक भाग बनला आहे. पण तुम्हाला माहित आहे का की, ज्याला तुम्ही केवळ एक मानसिक अवस्था समजता, तो तुमच्या हृदयाचा सर्वात मोठा शत्रू आहे.ओवा खाण्याच्या चुकीच्या पद्धतीने नुकसान होऊ शकते, योग्य पद्धत जाणून घ्या दीर्घकाळच्या तणावामुळे हृदयविकारांचा धोका अनेक पटींनी वाढतो. जेव्हा आपण तणावाखाली असतो, तेव्हा शरीरात कॉर्टिसोल आणि ड्रेनालाईनसारखे हार्मोन्स स्रवतात, जे थेट रक्तदाब आणि हृदयाचे ठोके वाढवतात.

वेळेवर नियंत्रण न केल्यास हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघातासारखी गंभीर परिस्थिती उद्भवू



शकते.गॅसच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने ग्रामीण भागातील शिधापत्रिकाधारकांना रॉकेल पुरवण्याचा निर्णय घेतला **हृदयासाठी काळे तीळ फायदेशीर** -दीर्घ श्वास-तणाव त्वरित कमी करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे दीर्घ श्वास घेणे. आयुर्वेदात याला प्राणायामाचा पाया मानले जाते. जेव्हा तुम्ही खोलवर श्वास घेता आणि हळूवारपणे सोडता, तेव्हा शरीरातील ऑक्सिजनची पातळी वाढते. विज्ञानानुसार, या प्रक्रियेमुळे आपली पॅरासिम्पॅथेटिक मज्जासंस्था सक्रिय होते, ज्यामुळे हृदयाचे ठोके सामान्य होतात आणि त्वरित मनःशांती मिळते.

शारीरिक क्रिया-दररोज फक्त ३० मिनिटे चालण्याने किंवा योगा केल्याने एंडोर्फिन नावाचे हार्मोन्स स्रवतात, जे तुमचा मूड सुधारतात. आयुर्वेदानुसार, व्यायामामुळे शरीरातील ऊर्जेचा समतोल राखला जातो, तर आधुनिक विज्ञानाच्या मते नियमित व्यायामामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयाचे स्नायू मजबूत होतात. सात्विक आहार-आयुर्वेदानुसार सात्विक आहार सर्वोत्तम मानला जातो. ताजी फळे, हिरव्या पालेभाज्या, संपूर्ण धान्य आणि पुरेसे पाणी केवळ शरीराचे पोषणच करत नाहीत, तर मनालाही शांत ठेवतात. अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध आहार दाह कमी करतो, जो हृदयरोगाचे एक प्रमुख कारण आहे.चांगली झोप -झोपेच्या कमतरतेमुळे तणाव निर्माण करणारे हार्मोन्स थेट वाढतात . जेव्हा तुम्हाला ७ ते ८ तास गाढ झोप मिळते, तेव्हा तुमचे शरीर स्वतःची दुरुस्ती करते आणि तुमच्या हृदयावरील अनावश्यक ताण कमी करते. चांगली झोप केवळ तुमचे मन ताजेतवाने करत नाही, तर रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासही मदत करते.ध्यान--तणावाची पातळी कायमस्वरूपी कमी करण्यासाठी नियमित ध्यान हा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतलं पाहिजे आणि कमी जेवण्यापेक्षा कमी वेळा जेवणं गरजेचं आहे असंही डॉ. दीक्षित म्हणाले. दोनवेळा जेवतानाही ते जास्तीत जास्त ५५ मिनिटांमध्ये संपवणं गरजेचं आहे. हा डाएटप्लॅन फॉलो केल्यास वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल, रक्तातील तीन महिन्यातील कळणारं साखरेचं प्रमाण कमी होईल आणि फास्टिंग शुगरही कमी होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकदा जेवतो तो योगी, दोनवेळा जेवतो तो भोगी आणि तीनवेळा जेवतो तो रोगी अशी संतांची शिकवण आहे, याचाही दाखला त्यांनी दिला. आहारात हे बदल केल्यामुळे वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल असा विश्वास त्यांनी कट्ट्यावर व्यक्त केला.




## २ Joke विनोद




एक माणूस भिकाऱ्याला दटावतो, ङ्गअरे एवढा धडधाकट आहेस. भीक काय मागतोस. कष्ट कर.फ ङ्गसाहेब, मोठ्या कष्टाने चोरी केली तर तुरुंगाची हवा खायला लागली.

## ३ Message संदेश




Teacher- Bataao bachcho jo galat kaam karte hain wo kaha jate hain??
Student- sharmate huye bola sir..
Manuabhaan tekri, EKAANT park, Chinar park, MAYUR park...

## ४ Thought सुविचार




स्वत:ची इच्छा पूर्ण न झाल्याने अस्वस्थ होणारी माणसं किती आहे हे मोजण्याची गरज नाही , आणि दुसऱ्याची इच्छा आणि गरज पुरी करता आली नाही म्हणून अस्वस्थ होणारा विरळाच !
- शेक्सपिअर

**संस्कृत सुभाषित**

कालभोजनमारोण्यकराणां श्रेष्ठम् ।।

अर्थः-व्यवसायानुसार भोजनाची वेळ वेगळी असली तरी त्यावेळी नित्यनियमितपणे भोजन घेणे हे श्रेष्ठ असते.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. पटकन, चटकन
४. प्राणी
७. विसराळू
१०. मायेची सावली
१२. पातळ खांब
१५. कपाळ
१७. आईचा भाऊ
१९. मज्जाव
२०. फुरसत
२१. एक श्वासरोग
२२. नवरा
२३. भाकरीचे एक धान्य
२४. उद्याच्या नंतरचा दिवस
२६. माहेरी आलेली स्त्री
२८. पूर्ण भरतीची वेळ
२९. दिवटी
३२. महासर्प
३५. पाणी
३६. चलनवलन
३९. तमाशा
४०. थेट
४१. केशरी गराचे व हिरव्या सालीचे फळ
४३. संरक्षणाचे आवरण
४४. दात
४५. पहारेकरी
४८. स्वत:ला
४९. गोंजारणे, समजूत काढणे
५०. अखंड
५१. मैत्रीण
५२. तोंड
५३. पुन्हा पुन्हा
५७. जिवलग
६०. चेष्टा, टिंगलटवाळी
६१. सीतेचे वडील
६३. एक चतुर्थांश
६५. माफी मागणारा
६७. छोट्यांची गाणी
७०. चांदीचा बिल्ला
७३. चिंचेची चव
७४. तात्पुरते रुसणे
७५. कोर्टातील कथन
७६. सोन्याची फुले उधळून घेण्याचे हक्कदार
७७. सबब, निमित्त

### उभे शब्द

१. टप्प्या टप्प्यानी केलेला प्रवास
२. अलमारी
३. निर्जीव तरी वाढणारे
५. चौक
६. पाठविलेला
८. मध्यम प्रमाण
९. आकांत करणे
११. रमापती
१३. शिर्डीचे संत
१४. कट्टर
१६. तिबेटी धर्मगुरु
१८. संगीतातील एक राग
१९. मृत्यू
२५. लक्ष्मी
२६. सामान
२७. थंड
३१. रेशमी वीण असलेल्या पदराची साडी
३२. फावला वेळ
३३. विश्व
३४. अखबार
३६. जादू
३७. रेशमाची गुंडाळी
३८. गडीमाणसे
४१. आपले नसलेले
४२. प्रश्न
४३. विद्या
४६. अफूचे बी
४७. निकट, जवळ
४८. मनातील इमले
५१. हेतूपूर्वक
५३. तपासणी करणारा, पारखी
५४. मुलगी
५५. धोबी
५६. शरीर
५८. वैयक्तिक
५९. मेहेरबानी
६२. खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
६४. राबता, जाणे येणे
६६. पाऊले
६८. खोटी तात्पुरती भावना
६९. युवक
७०. चांदी
७१. अर्धी ओंजळ
७२. सावध
७३. आम्रफल

### आडवे उत्तर

१.मटकन ४.जनावर ७.विसरभोळा १०.पाखर १२.वासा १५.ललाट १७.मामा १९.मनाई २०.सवड २१.दमा २२.वर २३.बाजरी २४.परवा २६.माहेरवाशीण २८.समा २९.मशाल ३२.अजगर ३५ जल ३६.हालचाल ३९.वग ४०.तडक ४१.पपनस ४३.कवच ४४.रद ४५.रखवालदार ४८.मला ४९.चुचकारणे ५०.सलग ५१.सखी ५२.मुख ५३.परत परत ५७.सखा ६०.थट्टामस्करी ६१.जनक ६३.पाव ६५.क्षमायाचक ६७.बालगीत ७०.रौप्यपदक ७३.आंबट ७४.रुसवा ७५.साक्ष ७६.पणजोबा ७७.कारण

### उभे उत्तर

१.मजल दर मजल २.कपाट ३.नख ५.नाका ६.रवाना ८.सरासरी ९.भोकाड पसरणे ११.रमावर १३.साईबाबा १४.कडवा १६.लामा १८.मारवा १९.मरण २५.रमा २६.माल २७.शीतल ३१.टोपपदर ३२.अवसार ३३.जग ३४.समाचारपत्र ३६.हातचलाखी ३७.लड ३८.चाकरचुकर ४१.परका ४२.सवाल ४३.कला ४६.खसखस ४७.लगत ४८.मनोरथ ५१.सकाम ५३.परीक्षक ५४.तनया ५५.रजक ५६.तन ५८.खाजगी ५९.कृपा ६२.कबाब ६४.वहिवाट ६६.चरण ६८.लटका ६९.तरुण ७०.रौप्य ७१.पसा ७२.दक्ष ७३.आंबा




## थोडक्यात/ संक्षिप्त



### शेन वॉर्नचा २० वर्षांपूर्वीचा तो एक निर्णय अन् आता कुटुंबाला तब्बल ४६० कोटी

**दिल्ली**–ऑस्ट्रेलियाचा माजी फिरकीपटू दिवंगत शेन वॉर्नच्या कुटुंबीयांना राजस्थान रॉयल्सकडून ४५० ते ४६० कोटी रुपये मिळू शकतात. हा फायदा वॉर्नने २० वर्षांपूर्वी संघासोबत करार करताना घेतलेल्या एका निर्णयामुळे मिळू शकतो. इंडियन प्रीमियर लीगच्या पहिल्या हंगामात राजस्थान रॉयल्सने फिरकीपटू शेन वॉर्नची कर्णधार म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी, त्याच्यावर केवळ खेळाडू आणि कर्णधार म्हणूनच नव्हे, तर क्रिकेट ऑपरेशन्सशी संबंधित अनेक निर्णयांची जबाबदारीही सोपवण्यात आली होती. या काळात, वॉर्नने आपल्या पगारासोबत फ्रँचायझीमध्ये वाटा मागितला होता, जो संघ व्यवस्थापनाने मान्य केला. राजस्थान रॉयल्सने इंडियन प्रीमियर लीगचा पहिला हंगाम जिंकला. ४ मार्च २०२२ रोजी वयाच्या ५२ व्या वर्षी शेन वॉर्नचे निधन झाले. शेन वॉर्नच्या कुटुंबीयांना मोठा फायदा राजस्थान रॉयल्स व्यवस्थापनाने केलेल्या करारानुसार, वॉर्नला प्रति सीझन अंदाजे ₹६५७,००० पगार आणि संघात ०.७५ टक्के हिस्सा देण्यात आला.

### भारत-ऑस्ट्रेलिया सीरिजचे शेड्यूल जाहीर, कुठे-कधी होणार सीरिज?

**मुंबई**–आयपीएल २०२६ चा मोसम सुरू व्हायच्या आधी बीसीसीआयने टीम इंडियाच्या २०२६–२७ च्या घरच्या हंगामाची घोषणा केली आहे.
भारतीय टीम १७ वेगवेगळ्या ठिकाणांवर २२ आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे. टीम इंडियाच्या घरच्या हंगामाची सुरूवात २७ सप्टेंबरपासून वेस्ट इंडिजविरुद्धच्या लिमिटेड ओव्हरच्या सीरिजपासून होणार आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध टीम इंडिया ५ वनडे आणि ३ टी–२० सामने खेळणार आहे.
भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातली सीरिज १७ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. वनडे मॅच तिरुवनंतपुरम, गुवागाटी आणि न्यू चंडीगढ येथे होतील. तर टी–२० सामने लखनऊ, रांची, इंदूर, हैदराबाद आणि बंगळुरू येथे होणार आहेत. बंगळुरूमध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना ऑक्टोबर २०२४ मध्ये झाला होता.यानंतर १३ डिसेंबर ते २७ डिसेंबरदरम्यान भारत आणि श्रीलंका यांच्यात सीरिज होईल.

### ५० लढती, १२ शहरांत सामने खेळवणार!

**मुंबई**–भारतीय क्रिकेट नियामक बोर्डाकूडन यंदाच्या वर्षातील आयपीएलच्या दुसऱ्या सत्रातील वेळापत्रक जारी करण्यात आलं आहे. यापूर्वी बीसीसीआयने पहिल्या टप्प्यातील वेळापत्रक जारी केले असून दोनच दिवसांत आयपीएलचा धुरळा उडणार आहे. २८ मार्च रोजी आयपीएलचा पहिला सामना सनरायजर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंज बंगळुरू यांच्यात बंगळुरुतील चेन्नास्वामी स्टेडियमवर रंगणार आहे. तर, स्पर्धेतील दुसऱ्या सत्रातील सामने १३ एप्रिल ते २४ मे २०२६ या कालावधीत देशातील १२ ठिकाणी खेळविण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात एकूण ५० सामने होणार आहेत. त्यामुळे, पुढील दोन महिने क्रिकेट चाहत्यांसाठी मोठी पर्वणी आणि फुल टू मनोरंजन असणार आहे. आयपीएलचा यंदाच्या हंगामाला दोन दिवसात म्हणजे २८ मार्चपासून सुरुवात होणार आहे. आयपीएलच्या पहिल्या सत्राचं वेळापत्रक आधीच जाहीर झालं होतं. त्यानुसार २८ मार्च ते १२ एप्रिलपर्यंतचं २० सामन्यांचं वेळापत्रक

# आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द!

नवी दिल्ली: जगातील सर्वात मोठी क्रिकेट लीग स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. या स्पर्धेला २८ मार्चपासून सुरूवात होणार आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ बलाढ्य सनरायझर्स हैदराबाद संघाचा सामना करताना दिसून येणार आहे. हा सामना बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. पण या सामन्याआधी बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. स्पर्धेला सुरूवात होण्याआधी ओपनिंग सेरेमनीत कुठलाही धुमधडाका किंवा जल्लोष केला जाणार नाही.

### बीसीसीआयने घेतला सर्वात मोठा निर्णय



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला आपलं पहिलं जेतेपद मिळवण्यासाठी १८ वर्ष वाट पाहावी लागली. आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्जला पराभूत करून पहिल्यांदाच जेतेपदाची ट्रॉफी उंचावली. त्यामुळे खेळाडू दुसऱ्याच दिवशी अहमदाबादहून बंगळुरूत दाखल झाले होते. पण हा ऐतिहासिक दिवस बंगळुरू संघासाठी ब्लॅक डे ठरला. विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी क्रिकेट चाहत्यांनी चिन्नास्वामी मैदानात हजारोंच्या संख्येने गर्दी केली. तर मैदानाबाहेर त्याहून जास्त लोकांनी गर्दी केली होती. दरम्यान परिस्थिती हाताबाहेर गेल्याने चेंगराचेंगरीची घटना घडली. या घटनेत ११ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. ज्यात १४ वर्षांच्या चिमुकल्याचाही समावेश होता.या घटनेत जीव गमावलेल्या ११ पीडितांप्रती संवेदनशीलता, आठवण आणि आदर व्यक्त करण्यासाठी बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. दरवर्षी आयपीएल स्पर्धेतील पहिल्या सामन्याआधी रंगारंग कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.
पण यावेळी कुठल्याही कार्यक्रमाशिवाय आरसीबी विरूद्ध हैदराबाद सामन्याची सुरूवात केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ङ्गगेल्या वर्षी ४ जूनला घडलेल्या दुःखद घटनेमुळे आयपीएल स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कुठल्याही कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार नाही. आयपीएलच्या सुरूवातीला कुठल्याही सांस्कृतिक किंवा मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार नाही.ङ्घ तर स्पर्धेतील अंतिम सामन्यावेळी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती देवजित सैकिया यांनी दिली आहे.

### म्हणून आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द

मुंबई,–आयपीएल २०२६ ची सुरुवात २८ मार्चपासून होणार असली तरी यंदा स्पर्धा कोणत्याही उद्धाटन सोहळ्याशिवाय सुरू होणार आहे. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (ींण) आणि सनरायझर्स हैदराबाद (ीीप) यांच्यात पहिला सामना खेळला जाणार आहे. मात्र, बीसीसीआयने यंदा ओपनिंग सेरिमनी रद्द करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे.म्हणून उद्धाटन सोहळा रद्द :मिळालेल्या माहितीनुसार, ४ जून २०२५ रोजी बंगळुरूमध्ये घडलेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बीसीसीआयने आयपीएलच्या १९व्या हंगामाचा उद्धाटन सोहळा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.



. चीनमधील तियानजिन येथे १० व्या जागतिक ज्युनियर वुशू चॅम्पियनशिपच्या उद्घाटन समारंभात सादरीकरण करताना कलाकार.

# मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी निवड चाचण्या जाहीर

मुंबई –महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत 'मिशन लक्ष्यवेध'अंतर्गत मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडूंची निवड प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश राज्यातील गुणवंत खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी घडवणे हा आहे.
या उपक्रमांतर्गत वेटलिफ्टिंग, लॉन टेनिस, शूटिंग व टेबल टेनिस या क्रीडा प्रकारांसाठी विभागीय स्तरावर निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. निवड प्रक्रियेदरम्यान तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत खेळाडूंचे कौशल्य परीक्षण करण्यात येणार असून निवड झालेल्या खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शन दिले जाणार आहे.
निवड चाचणी तपशील पुढीलप्रमाणे :
१) वेटलिफ्टिंग–ठिकाण : तालुका क्रीडा संकुल, कोपरी, ठाणे
संपर्क प्रमुख : श्रीमती हिमानी परब
मोबाईल : ८३६९७१६०४६
दिनांक : ०६ एप्रिल २०२६` वेळ : सकाळी ८.०० वा.
२) लॉन टेनिस
ठिकाण : महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन, कुपरेज क्लब, मुंबई
संपर्क प्रमुख : श्रीमती प्रीती टेमघरे
मोबाईल : ९०२९२५०२६८
दिनांक : ०७ एप्रिल २०२६` वेळ : सकाळी ८.०० वा.
३) शूटिंग
ठिकाण : कामगार कल्याण मंडळ, दादर, मुंबई
संपर्क प्रमुख : श्रीमती नेहा साप्ते
मोबाईल : ९९६९९७२०२२
दिनांक : ०८ एप्रिल २०२६` वेळ : सकाळी ८.०० वा.
४) टेबल टेनिस
ठिकाण : नवी मुंबई स्पोर्ट्स अँड सामाजिक विकास मंडळ, पनवेल
संपर्क प्रमुख : श्री. नीलकंठ आखाडे
मोबाईल : ९९६७२७७०८२
दिनांक : ०९ एप्रिल २०२६` वेळ : सकाळी ८.०० वा.या निवड चाचण्यांसाठी २५ वर्षाखालील खेळाडू पात्र असून, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतलेला अनुभव आवश्यक आहे. इच्छुक खेळाडूंनी आपला अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करावा.
अर्जासोबत जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट व पालक संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे. निवड चाचणीच्या दिवशी मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.
ही माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

## पाकिस्तान सुपर लीगचे सामने भारतात लाईव्ह कुठे पाहता येणार?

मुंबई–टी–२० क्रिकेटचा फिव्हर सुरू झाला आहे. येणाऱ्या २ महिन्यात क्रिकेट चाहत्यांना क्रिकेटचे एकापेक्षा एक थरारक सामने पाहायला मिळणार आहेत. २९ मार्चपासून आयपीएल २०२६ स्पर्धेला सुरूवात होणार आहे. तर आजपासून पाकिस्तान सुपर लीग म्हणजे, पीएसएल स्पर्धेच्या ११ व्या हंगामाला सुरूवात होणार आहे. आयपीएलमधून निवृत्त झालेले आणि ऑक्शनमध्ये अन्सोल्ड राहिलेले बरेचशे खेळाडू या स्पर्धेत खेळताना दिसून येणार आहेत. दरम्यान पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतील सामने भारतात लाईव्ह कुठे पाहता येणार? जाणून घ्या.
भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये तणावपूर्ण वातावरण आहे. त्यामुळे पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतील सामने भारतात थेट प्रक्षेपित केले जाणार नाहीत. पण या स्पर्धेतील सामने जगभरातील अनेक देशांमध्ये प्रसारित केले जाणार आहेत.
या स्पर्धेतील सामने ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये लाईव्ह दाखवण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने ईएसपीएनसोबत करार केला आहे. त्यामुळे ही स्पर्धा पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या संख्येत वाढ होऊ शकते.
पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतील सामने हे जगभरातील वेगवेगळ्या चॅनेलवर लाईव्ह पाहता येणार आहेत. यूकेमध्ये या स्पर्धेतील सामने अींभ ुूरत, अींभ इत्ले आणि ऊरज्स् वर लाईव्ह पाहता येणार आहेत. तर बांगलादेशमध्ये ऊेप्दी, ऊरज्स् वर लाईव्ह पाहता येणार आहेत. श्रीलंकेतील क्रिकेट चाहते ग्त्दु ूतन्ेग्दह वर, नेपाळमधील क्रिकेट चाहते ऊरज्स् वर लाईव्ह पाहू शकतात. अमेरिका आणि कॅनडातील क्रिकेट चाहते हे सामने`ग्त्दै ू वर लाईव्ह पाहू शकतात.
भारतात पाकिस्तान सुपर लीगचे सामने लाईव्ह पाहता येणार का?
पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतील सामने भारतात पाहता येणार नाहीत. कारण भारतात ही स्पर्धा ब्रॉडकास्ट केली जाणार नाही. याआधी या स्पर्धेतील सामने फॅनकोडवर प्रक्षेपित केले जात होते. पण पहलगाम हल्ल्यानंतर फॅनकोडने पाकिस्तानचे सामने प्रक्षेपित करणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे फॅनकोडचं सब्स्क्रिप्शन असूनही तुम्हाला हे सामने लाईव्ह पाहता येणार नाहीत. यावेळी ८ संघांमध्ये एकूण ४४ सामने खेळवले जाणार आहेत. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात

## उत्तर प्रदेशात रिंकू सिंहला स्पेशल गिफ्ट पण ते स्वीकारण्यासाठी गेलाच नाही!



दिल्ली–मुख्यमंत्री योगी आदित्यानाथ यांनी लखनौमध्ये उत्तर प्रदेशातील पाच खेळाडूंना नियुक्तीपत्रे सुपूर्द केली. त्यांनी इतर ४० खेळाडूंना पुरस्कारही प्रदान केले. क्रिकेटपटू रिंकू सिंहचाही समावेश आहे. त्याची क्रीडा अधिकारी (ींएध) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, रिंकू सिंह आपले नियुक्तीपत्र घेण्यासाठी या कार्यक्रमाला उपस्थित राहिला नसल्याने भूवया उंचावल्या. यावर प्रतिक्रिया देताना योगी म्हणाले की, रिंकू आधीच एका शिबिराचा भाग होता आणि तिथेच उपस्थित होता, त्यामुळे तो येऊ शकला नाही. त्याचे नियुक्तीपत्र येथेच ठेवले असून ते त्याला नंतर दिले जाईल.
कोणते क्रीडापटू अधिकारी झाले?
खेळाडूंना नियुक्तीपत्रे देताना योगी गंमतीच्या मूडमध्ये असल्याचेही दिसून आले. ते गंमतीने म्हणाले, ''आमच्या गृहसचिवांनीही गल्ली–दंडा खेळला आहे. चौकार किंवा षटकार कुठेही मारले तरी, चेंडू आणि बॅट उत्तर प्रदेशचीच आहे.'' गाझीपूरचे राजकुमार पालची पोलीस विभागात डीएसपी म्हणून नियुक्ती करण्यात आली. नोएडाचे ऑलिम्पिक पदक विजेता प्रवीण कुमार, इटावाचा अजित सिंह आणि गाझियाबादचा सुमीरन यांना पंचायती राज अधिकारी म्हणून नियुक्तीपत्रे मिळाली. दरम्यान, मुझफ्फरनगरचे रहिवासी प्रीतिपालची ब्लॉक विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. क्रीडा संचालक आर. पी. सिंह यांनी सांगितले की, ज्या खेळाडूंना नोकरी मिळाली, त्यामध्ये रिंकू टी–२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाचा भाग होता. राजकुमार पाल ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचा सदस्य होता. याशिवाय, प्रवीण कुमारने उंच उडीत सुवर्णपदक, अजित सिंगने भालाफेकीत रौप्य पदक आणि सुमीरनने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये २०० मीटर शर्यतीत कांस्य पदक जिंकले. मुझफ्फरनगरच्या रहिवासी असलेल्या प्रीतिपालने १०० मीटर आणि २०० मीटर पॅरा–ॲथलेटिक्समध्ये कांस्य पदके जिंकली.
योगी काय म्हणाले?मुख्यमंत्री योगी म्हणाले, ''या खेळाडूंनी देशाला आणि राज्याला गौरव मिळवून दिला आहे. त्यांचा सन्मान करणे ही अभिमानाची बाब आहे. सरकारने खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

# आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्याचे बिगुल वाजले; १० संघ, ५० सामने

## अन् १२ शहरात रंगणार क्रिकेटचा थरार!

मुंबई–भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बहुप्रतिक्षित आयपीएल २०२६ च्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केलं आहे. त्यामुळं आता यंदाच्या मोसमात साखळी फेरीत एकूण किती सामने होणार? कोणत्या शहरांमध्ये होणार? हे चित्र स्पष्ट झाले आहे. आयपीएलने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉमद्वारे दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांचे वेळापत्रक जाहीर करत वेळापत्रकाची माहिती दिली. परंतु, बीसीसीआयने अद्याप प्ले–ऑफ आणि अंतिम सामन्याच्या तारखा जाहीर केलेल्या नाहीत.
दुसऱ्या टप्प्यात एकूण ५० सामने : आयपीएल स्पर्धेच्या १९ व्या हंगामातील दुसऱ्या टप्प्यात ५० तर एकूण मिळून ७० साखळी सामने होणार आहेत. तर नेहमीप्रमाणे प्लेऑफमधील सामन्यांचं वेळापत्रक हे शेवटच्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे.




मयाफ शहरांमध्ये रंगणार आयपीएलचे सामने : बीसीसीआयनं यापूर्वी १२ एप्रिलपर्यंतच्या सामन्यांचं वेळापत्रक जाहीर केलं होतं. आता १३ एप्रिल ते २४ मे पर्यंतचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. दुसऱ्या टप्प्यात आयपीएलचे सामने १२ शहरांमध्ये खेळवले जाणार आहेत. यामध्ये बंगळूर, मुंबई, चेन्नई, कोलकाता, दिल्ली, अहमदाबाद, हैदराबाद, लखनौ, जयपूर, धर्मशाला, रायपूर आणि न्यू चंदीगड या शहरांचा समावेश आहे. १३ एप्रिलला हैदराबादमध्ये सनरायझर्स हैदराबादचा सामना राजस्थान रॉयल्सशी होणार आहे.दुसऱ्या वेळापत्रकात आठ डबलहेडर सामन्यांचा समावेश : बीसीसीआयनं जाहीर केलेल्या दुसऱ्या टप्प्यातील वेळापत्रकात एकूण आठ डबलहेडर सामन्यांचा समावेश आहे. यात दुपारच्या सत्रातील सामन्याला भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:३० वाजता आणि संध्याकाळच्या सत्रातील सामन्याला सायंकाळी ७:३० वाजता सुरुवात होणार आहे. पंजाब किंग्स संघाचे होम ग्राऊंडवरील सामने न्यू चंदीगड आणि धर्मशाळा मैदानावर खेळवले जाणार आहेत. त्यानुसार धर्मशाळा मैदानावर तीन सामने खेळवले जाणार आहेत. राजस्थान रॉयल्स आपल्या होम ग्राऊंडवर म्हणजेच जयपूरमध्ये चार सामने खेळणार आहेत. तर गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु (आरसीबी) आपल्या होम ग्राऊंडवर तीन आणि रायपूरमध्ये खेळणार आहे.बीसीसीआयनं वेळापत्रक दोन भागांमध्ये का जाहीर केलं? : बीसीसीआयनं आयपीएल २०२६ चं वेळापत्रक दोन भागांमध्ये जाहीर केलं आहे. पहिल्या भागात बीसीसीआयने २० सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले होते. तर गुरुवारी जाहीर केलेल्या दुसऱ्या भागात उर्वरित ५० सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले. पाच राज्यांमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकांमुळे आयपीएलचे वेळापत्रक दोन भागांमध्ये जाहीर केलं. पुढील महिन्यात आसाम, पुदुचेरी, केरळ, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहे. या राज्यांमधील निवडणुका जाहीर झाल्यानंतर बीसीसीआयने लीग सामन्याचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले.

# भारतीय रेल्वेकडून ११,१२७ सहाय्यक लोको पायलट पदांसाठी अर्ज आमंत्रित

## रेल्वेच्या वार्षिक भरती दिनदर्शिकेमुळे उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधीमध्ये वाढ

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभाग हा भारतीय रेल्वेच्या सर्व विभागांमध्ये 'सहाय्यक लोको पायलट' (ALPs) पदांच्या भरतीसाठी 'रेल्वे भरती मंडळां'नी (RRBs) प्रसारित केलेल्या 'केंद्रीय रोजगार अधिसूचने' (CEN) क्रमांक ०१/२०२६ संदर्भातील सूचक माहितीकडे (indicative notice) इच्छुक उमेदवारांचे लक्ष वेधून घेत आहे.

ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १५ मे २०२६ पासून सुरू होईल आणि १४ जून २०२६ (रात्री २३:५९ वाजेपर्यंत) खुली राहील. उमेदवारांनी त्यांचे अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच, RRB च्या अधिकृत संकेतस्थळांद्वारे किंवा थेट अधिकृत भरती संकेतस्थळावर (https://www.rrbapply.gov.in) सादर करणे अनिवार्य आहे. भारतीय रेल्वेच्या सर्व विभागांमध्ये (Zones) मिळून एकूण ११,१२७ रिक्त पदांची घोषणा करण्यात आली आहे.

**अर्जदारांसाठी महत्त्वाच्या सूचना:**

* ज्या अर्जांची आधारद्वारे पडताळणी झालेली नसते, अशा अर्जांच्या प्रत्येक टप्प्यावरील सखोल तपासणीमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी, उमेदवारांनी अर्ज प्रक्रियेदरम्यान 'आधार'चा वापर करून आपल्या प्राथमिक तपशीलांची पडताळणी करून घेण्याचा सल्ला दिला जातो.
* आधार कार्डवरील नाव आणि जन्मतारीख, हे १० वीच्या गुणपत्रिकेवरील तपशीलांशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. तसेच, अर्ज करण्यापूर्वी आधार कार्डवर आपला अद्ययावत छायाचित्र (फोटो) आणि बायोमेट्रिक तपशील अद्ययावत (update) करून घेणे गरजेचे आहे.
* ही अधिसूचना केवळ सूचक स्वरूपाची असून, संभाव्य उमेदवारांना माहिती देण्यासाठी आणि आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांसह सज्ज राहता यावे या उद्देशाने जारी करण्यात आली आहे.

भरतीसाठीचे सविस्तर पात्रता निकष, नियम आणि अटी या RRB च्या अधिकृत संकेतस्थळांवर 'CEN क्रमांक ०१/२०२६' (आणि त्यासोबतची कोणतीही सुधारणा/शुद्धिपत्रक) मध्ये प्रकाशित केल्या जातील.

उमेदवार अहमदाबाद, अजमेर, बंगळुरू, भोपाळ, भुवनेश्वर, बिलासपूर, चंदीगड, चेन्नई, गोरखपूर, गुवाहाटी, जम्मू-श्रीनगर, कोलकाता, मालदा, मुंबई, मुझफ्फरपूर, पटना, प्रयागराज, रांची, सिकंदराबाद, सिलिगुडी आणि तिरुवनंतपुरम यांसारख्या संबंधित RRB च्या संकेतस्थळांद्वारे अर्ज करू शकतात. उमेदवारांनी विश्र्वसनीय माहितीसाठी केवळ अधिकृत आरआरबी (RRB) वेबसाइट्सवरच अवलंबून राहावे. दलाल, मध्यस्थ आणि नोकरीच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्यांपासून सावध राहावे. पुढील अद्यतनांसाठी, उमेदवारांनी नियमितपणे अधिकृत आरआरबी (RRB) वेबसाइट्सना भेट द्यावी.

भारतीय रेल्वेचे वार्षिक भरती वेळापत्रक - एक मोठी सुधारणा प्रणालीगत सुधारणांचा एक भाग म्हणून, रेल्वे मंत्रालयाने २०२४ पासून गट 'क' (Group "C") पदांसाठी वार्षिक भरती वेळापत्रक सुरू केले आहे. या उपक्रमामुळे इच्छुकांना खालीलप्रमाणे लक्षणीय फायदा होत आहे:

* उमेदवारांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होत आहेत
* दरवर्षी नव्याने पात्र ठरलेल्या उमेदवारांना समान संधी मिळण्याची खात्री होत आहे
* परीक्षांच्या वेळापत्रकात निश्र्चितता आणि पूर्वानुमेयता येत आहे
* जलद भरती, प्रशिक्षण आणि नियुक्ती शक्य होत आहे

हा संरचित दृष्टिकोन भारतीय रेल्वेची पारदर्शकता, कार्यक्षमता आणि इच्छुकांसाठी अनुकूल भरती प्रक्रियेप्रती असलेली वचनबद्धता दर्शवतो.

सहाय्यक लोको पायलट्सची भरती ही भारतीय रेल्वेच्या संपूर्ण नेटवर्कमध्ये कार्यात्मक कार्यक्षमता, सुरक्षितता आणि



क्षमता वाढवण्याच्या चालू प्रयत्नांचा एक महत्त्वाचा घटक आहे. हा उपक्रम पायाभूत सुविधांचा विकास, आर्थिक वाढ आणि रोजगार निर्मिती या व्यापक राष्ट्रीय अजेंड्याला पाठिंबा देतो, त्याचबरोबर वेगाने आधुनिकीकरण होत असलेल्या भारतीय रेल्वेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कुशल मनुष्यबळाची उपलब्धता सुनिश्र्चित करतो.

# पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

वाशी धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रदीप रा. झेंडेवाडी ता. भुम जि. धाराशिव हे दि.२४.०३.२०२६ रोजी १७.१५ वा. सु. ईट शिवारातील पखरुड रोडलगत हॉटेल जगदंबा च्या पाठीमागे अंदाजे २,२४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर सिंदुबाई रा. इंदापुर ता. वाशी जि. धाराशिव या दि.२५.०३.२०२६ रोजी इंदापुर शिवारात अंदाजे ८,७०० किंमतीची ९ लिटर गावठी दारु व १५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. तर कमलबाई रा. सरमकुंडी ता. वाशी जि. धाराशिव या दि.२५.०३.२०२६ रोजी ०९.३० वा. सु. सरमकुंडी शिवारात आपल्या राहत्या घराचे बाजूला असलेल्या पत्र्याचे शेडच्या पाठीमागे अंदाजे १३,२०० किंमतीची ३५ लिटर गावठी दारु व २०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले.

# एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात उद्योजकता जागरूकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडो जर्मन टूल रूम,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता जागरूकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. श्री सुरज चंचलानी,डायरेक्टर सीबीएफसी लिमिटेड यांनी विद्यार्थ्यांना या विषयावर मार्गदर्शन केले तसेच शासनामार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली ज्यामुळे हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरले. तसेच विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी शोधण्यासाठी मोलाचे ज्ञान आणि प्रेरणा मिळाली. या कार्यशाळेत अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.




यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.श्रीकांत नागुरे,डॉ. ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे तसेच समन्वयक प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. सुरज बिराजदार यांनी सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री. माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री. माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री. सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री. विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री. प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री. राजेश्वर बुके, श्री. बसवराज येरटे, श्री.एड. काशिनाथ साखरे, सौ. ललितताई पांढरे, श्री. महेश हलगे, श्री. बाबुराव तरगुडे व श्री. गुरुलिंग धाराशिवे यांनी संबंधित प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ. मोहन बुके, प्राचार्य डॉ. शेखर जगदे, उपप्राचार्य वीरभद्र बाळे तसेच निबंधक डॉ. सौ. ज्योती पाटील यांनीही या उपक्रमाचे व संबंधित प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# नीलम गोऱ्हेंचा आदेश रद्द, तुषार दोशींचे निलंबन नाहीच; पोलीस अधीक्षक सातारा कार्यालयात दाखल

**सातारा/प्रतिनिधी :** पोलीस अधीक्षक तुषार दोशी हे आज त्यांचा पोलीस मुख्यालयात हजर झाले असून दैनंदिन कामकाजाला देखील त्यांनी सुरुवात केल्याचं पहायला मिळालं. विधिमंडळ अधिवेशन कार्यकाळात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे आदेश दिले होते. मात्र, अधिवेशनाच्या शेवटच्यादिवशी सभापती राम शिंदे यांनी उपसभापतींचा आदेश रद्द करत सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे, तुषार दोशी यांचे निलंबन झाले की नाही, हा प्रश्न अनुत्तरीत होता. मात्र, तुषार दोशी आज आपल्या कार्यालयात हजर झाल्याने त्यांचे निलंबन झाले नसल्याचे स्पष्ट झालं आहे. जिल्हा परिषद निवडणूक अध्यक्षपदाच्या निवडीवेळी राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांना जिल्हा परिषद सभागृहात घेऊन जाताना मंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांना पोलिसांकडून धक्काबुक्की झाली होती. या दरम्यान झालेल्या गोंधळानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी आणि त्यांच्या काही अधिकाऱ्यांना निलंबित करावे अशी मागणी केली होती. या मागणीनंतर सभागृहात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशी यांना निलंबित करण्याचे निर्देशही दिले होते.

# पोस्ट ऑफिस उडवण्याचा मेल; पोलिसांकडून तपास

धाराशिव (प्रतिनिधी)- राज्यातील पोस्ट कार्यालये आरडीएक्स व सायनाइड या विषारी वायूने उडवून देऊ, अशा धमकीचा मेल दुपारी धडकला होता. धाराशिव विभागीय पोस्ट कार्यालयातही छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडून हा मेल फॉरवर्ड करण्यात आला होता. येथील विभागीय पोस्ट कार्यालयात कर्मचाऱ्यांत भीतीचे वातावरण होते. पोलिस अधिकाऱ्यांनी कार्यवाही करत बॉम्बशोधक व नाशक पथकाने पोस्ट कार्यालय, पासपोर्ट कार्यालयाकडे धाव घेतली. धमकीचे मेल मिळाल्याची माहिती मिळताच पोलिस अधिकाऱ्यांनी थेट विभागीय पोस्ट कार्यालय गाठले. सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास शहर पोलिस ठाण्याच्या पारिसरातील मुख्य डाकघर कार्यालय व पासपोर्ट कार्यालयाच्या परिसरात बॉम्ब शोधक व नाशक पथकासह प्रमुख पोलिस उपनिरीक्षक सुनील सोनटक्के, हॅन्डलर सचिन मोरे यांनी पाहणी केली.

तुमच्या राज्यातील सर्व पासपोर्ट व टपाल कार्यालय १६ आरटीडीक्स व विषारी सायनाईडने दुपारी १२.१० वाजता उडवून देऊ, अशा आशयाचा मेल छत्रपती संभाजीनगर येथील पोस्टाच्या रिजनल ऑफिसला आला होता. खबरदारी म्हणून रिजनल ऑफिसने मेल येथील विभागीय डाकघर कार्यालयास दुपारी पावणे बारा वाजण्याच्या सुमारास पाठवला होता.

# कळंब शहरात गॅस तुटवडा टाळण्यासाठी प्रशासन सतर्क

कळंब (प्रतिनिधी)- आखातातील युद्धजन्य परिस्थितीचे पडसाद आता स्थानिक बाजारपेठेत उमटू लागले असून, व्यावसायिक गॅस पुरवठा विस्कळीत होण्याची चिन्हे दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये आणि साठेबाजीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासन सतर्क झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर जाणवू लागला आहे. या परिस्थितीचा गैरफायदा घेत काही ठिकाणी साठेबाजी वाढल्याचे दिसून येत असून, दैनंदिन गरजेच्या वस्तूंची अव्वाच्या सव्वा दराने विक्री होत असल्याने महागाईत वाढ झाली आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

महसूल विभागाकडून गॅस एजन्सी, गोदामे आणि विक्री केंद्रांची तपासणी केली जात असून, साठ्याची नियमित पाहणी केली जात आहे. कुठेही अनधिकृत साठा आढळल्यास किंवा जादा दराने विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी घाबरून गॅसचा साठा करू नये तसेच कोणताही गैरप्रकार आढळल्यास त्वरित प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पथकांकडून तपासण्या करण्यात येत आहेत तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या मार्गदर्शनाखाली साठेबाजी रोखण्यासाठी आठ विशेष पथकांची स्थापना करण्यात आली आहे. पुरवठा नायब तहसीलदार गोपाल तापडिया यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या या पथकांमध्ये मंडळ अधिकारी, तलाठी आणि कोतवाल यांचा समावेश असून, शहर व तालुक्यात अचानक तपासण्या केल्या जात आहेत. सिलिंडरच्या साठ्यावर विशेष लक्ष तालुक्यातील सर्व गॅस एजन्सींमधील उपलब्ध साठा, दैनंदिन विक्री व वितरण यावर प्रशासनाने बारकाईने लक्ष ठेवले आहे. सध्या कळंबमध्ये गॅसचा तुटवडा जाणवत नसल्याची माहिती समोर येत असली, तरी कमर्शियल गॅसच्या कमतरतेमुळे काही ठिकाणी हॉटेल चालकांकडून घरगुती गॅसचा वापर होत असल्याची चर्चा आहे. या प्रकाराकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. महसूल प्रशासनाकडून पेट्रोल पंपांवरही विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. कृत्रिम टंचाई निर्माण करून पेट्रोल किंवा डिझेलची जादा दराने विक्री होत नाही ना, याची काटेकोर तपासणी केली जात आहे.

# हरभऱ्याचे २७ कट्ट्याची अज्ञाताने केली चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- उमरगा पोलीस ठाणे : फिर्यादी नामे- राम वय ६५ वर्षे, रा. नाईकचाकुर ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे ६५,००० किंमतीचे हरभऱ्याचे २७ कट्टे हे दि.२१.०३.२०२६ रोजी २०.३० ते दि. २२.०३.२०२६ रोजी ०६.०० वा. सु.नाईचाकुर शिवारात माज येथे रोडलगत असलेल्या जमिनीतुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राम घाटे यांनी दि.२३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१ धाराशिव**

**पत्ता-सिंचन भवन, आनंद नगर, धाराशिव**

ईमेल-eekmed1@gmail.com दुरध्वनी क्र/.ईमेल-(02472)228745

**ई-निविदा सुचना क्र.१६ सन २०२५-२६ (द्वितीय मागणी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1 धाराशिव. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1 धाराशिव यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. कामाचे नाव : | कृष्णा मराठवाडा उ.सिं.यो २ अंतर्गत टप्पा ६, रामदरा ते बोरी एकुरगा PDN च्या कामाकरिता (८५ किमी.) अन्वेषण ( Taking Trial Bore Hole Date for Investgation and Foundation Exploration) चे काम करणे. |
| २. कामाचा जिल्हा | : धाराशिव (महाराष्ट्र राज्य) |
| ३. निविदेची किंमत | : रु.१८३.८४ लक्ष (वस्तु व सेवा कर वगळून) |
| ४. ई निविदा उपलब्ध कालावधी | : दि. २७.०३.२०२६ ते दि.०६.०४.२०२६ |
| ५. ई निविदा उघडण्याचा दिनांक | : दि. ०८.०४.२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| ६. इसारा / बयाना रक्कम | : रु. १.५०/- लक्ष |
| ७. काम पूर्ण करण्याचा कालावधी | : ०६ महिने |
| ८. ई निविदा संचाची किंमत | : रु. २३६०/- (वस्तु व सेवा कर सह) |
| ९. कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | : निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करू शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

ई निविदा बाबत सर्व माहिती खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

i) शासनाचे संकेतस्थळ - https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

ii) कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. १, विभाग, धाराशिव यांचे कार्यालयातील नोटीस बोर्ड.

जा.क्र. कृमबांविक्र.1/लेखा-2/ निविदा/772
कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1
धाराशिव यांचे कार्यालय,
दिनांक:-24-03-2026

स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम
विभाग क्र.१ धाराशिव



**मध्य रेल्वे**

**सोलापुर मंडळ**

**एलसी गेट्सवरील पेडस्टल इत्यादींची बदली**

**निविदा सूचना क्र.: SUR N-T-2025-26-48 दिनांक: २४.०३.२०२६** DRM(ST) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम आणि प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळा **www.ireps.gov.in** द्वारे ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत:- **कामाचे नाव आणि ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात,एलसी गेट्सवरील मुदत संपलेल्या गेट पेडस्टलची आणि संबंधित उपकरणांची बदली करणे. **निविदा क्र.:** SUR-N-T-2025-26-48 **कामाचा अंदाजित खर्च:** १,५९,३५,२११.५४. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **जमा करावयाची अनामत रक्कम:** २,२९,७००. **कामाचा पूर्तता कालावधी:** १२ महिने. **निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** २०/०४/२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. काही शुद्धीपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेलद्वारे, फॅक्सद्वारे किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक हमी या पर्यायांचा स्वीकार केला जाईल. बँक हमीच्या मूळ प्रतीची निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन सुपूर्द करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 07



**मध्य रेल्वे**

**सोलापुर मंडळ**

**सिग्नलींगची कामे**

**निविदा सूचना क्र.: SUR-N-T-2025-26-47 दिनांक: २४.०३.२०२६.** DRM (ST) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे, खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **कामाचे नाव आणि ठिकाण:** सोलापूर विभागातील सोलापूर-कुर्डुवाडी सेक्शनमध्ये एलसी-४० आणि एलसी-४२ च्या जागी ROB बांधकामाशी संबंधित सिग्नलिंगचे काम. **निविदा क्र.:** SUR-N-T-2025-26-47. **कामाचा अंदाजित खर्च:** १,३३,४३,३२४.२७. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **जमा करावयाची अनामत रक्कम:** २,१६,७००. **कामाचा पूर्तता कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** २०/०४/२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. काही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग III प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटी या माध्यमांचा स्वीकार केला जाईल. बँक गॅरंटीच्या बाबतीत, मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 06

# दिव्यांग लाभार्थ्यांसाठी अर्थसहाय्यात वाढ ; UDID- आधार लिंक व DBT नोंदणी अनिवार्य

**धाराशिव (जिमाका)**- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजना विभागाकडील शासन निर्णय १५ सप्टेंबर २०२५ अन्वये दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अर्थसहाय्यात १५०० रुपयांवरून २५०० रुपये वाढ करण्यात आलेली असून ही वाढ ऑक्टोबर २०२५ पासून लागू करण्यात आलेली आहे.तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजना विभागाकडील शासन निर्णय २४ फेब्रुवारी २०२६ अन्वये विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थी दिव्यांग कल्याण विभागाकडे माहे एप्रिल २०२६ पासून वर्ग करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री.तुकाराम मुंढे,सचिव दिव्यांग कल्याण विभाग,यांनी विशेष सहाय्य योजनेंतर्गत दिव्यांग प्रवर्गामधून लाभ घेत असलेल्या लाभार्थी यांचे UDID कार्ड त्यांच्या आधारशी संलग्न करणे तसेच महाडीबीटी पोर्टलवर त्यांचा युडीआयडी क्रमांक भरणेबाबत सर्व जिल्हाधिकारी, शासकिय रूग्णालयाचे अधिष्ठाता,जिल्हा आरोग्य अधिकारी व समाज कल्याण अधिकारी यांच्याशी संवाद साधला असून दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वरील बाबी अनिवार्य असल्याचे नमूद केले आहे. यामुळे योजनेतील पारदर्शकता वाढणार आहे.

युडीआयडी कार्डला आधार लिंक कुठे व कसे करावे याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले आहे : दिव्यांग लाभार्थी यांचे UDID कार्ड त्यांच्या आधारशी संलग्न करणेसाठी णऊखऊ पोर्टलवर जाऊन लाभार्थ्यांचे एनरोलमेंट नंबर किंवा णऊखऊ क्रमांक व जन्म दिनांक टाकून लॉग इन झाल्यानंतर E-KYC मध्ये लाभार्थ्यांचा आधार नंबर टाकल्यानंतर ओटीपी जनरेट करुन (सदरचा ओटीपी लाभार्थ्यांच्या रजिस्टर मोबाईल नंबरवर जाणार आहे.)आधार व्हेरीफाईड करुन केवायसी करणे.सदर सुविधा आपले सरकार सेवा केंद्र,सीएससी सेंटर किंवा महा ई सेवा केंद्रावर उपलब्ध आहे.

यासाठी लाभार्थ्याचे आधार कार्ड, युडीआयडी कार्ड (ऑनलाईन पध्दतीने काढण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र) तसेच आधार कार्डला मोबाईल क्रमांक जोडणे आवश्यक आहे.ज्या लाभार्थ्यांकडे ऑफलाईन पध्दतीने काढण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र असतील त्यांनी अद्ययावत युडीआयडी कार्ड मिळण्यासाठी युडीआयडी पोर्टलवर विनंती अर्ज सादर करावा.

विशेष सहाय्य योजनेंतर्गत दिव्यांग प्रवर्गामधून दरमहा २५०० रुपये अर्थसहाय्याचा लाभ घेण्यासाठी आधार व्हेरीफाय झाल्यानंतर DBT पोर्टलवर लाभार्थ्यांचे UDID क्रमांक अद्यावत करणे आवश्यक आहे.यासाठी सदर दिव्यांग लाभार्थ्यांनी त्यांच्या युडीआयडी कार्ड व आधार कार्डची प्रत गावातील तलाठी कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयातील संजय गांधी योजना विभागामध्ये जमा करावी. वरीलप्रमाणे विशेष सहाय्य योजनेंतर्गत दिव्यांग प्रवर्गामधून अर्थसहाय्याचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग लाभार्थ्यांनी युडीआयडी क्रमांकाची पडताळणी, युडीआयडी क्रमांकास केवायसी करणे (KYC) व युडीआयडी क्रमांकाची नोंदणी डीबीटी पोर्टलवर करावी,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# तामलवाडीत ७७ कळसांची दिंडी प्रदक्षिणा: गाव भक्तिमय

**तामलवाडी/प्रतिनिधी:** विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या कळसारोहण सोहळ्यानिमित्त तामलवाडी येथे आयोजित भव्य प्रदक्षिणा दिंडीने संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. सायंकाळी पाच वाजता सुरू झालेल्या या दिंडीत मंदिराच्या मुख्य कळसासह एकूण ७७ कळसांची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली.

या दिंडीत ७६ लेकींनी कळस वाहत सहभाग नोंदवला, तर सुमारे ६५० महिलांनी कलश घेऊन भक्तिभावाने सहभाग घेतला. प्रस्थान प्रसंगी गुरुवर्य कान्होबा महाराज देहूकर व निळकंठ महाराज देहूकर यांची विशेष उपस्थिती लाभली. कळसांचे पूजन करून ते सुवासिनींच्या डोक्यावर ठेवण्यात आले होते. डोक्यावर कळस धारण करून महिलांनी श्रद्धेने प्रदक्षिणेत सहभाग घेतला.

दिंडीत सहभागी सर्व महिलांनी एकसारखी साडी परिधान केल्यामुळे एकात्मतेचे दर्शन घडले. पारंपरिक वेशभूषेमुळे सोहळ्याला विशेष देखणेपणा प्राप्त झाला. टाळकरी, पखवाज वादक आणि ध्वजधारी वारकऱ्यांच्या उपस्थितीने वातावरण भारावून गेले. ज्ञानोबा-तुकारामच् या जयघोषाने संपूर्ण गाव दुमदुमून गेले.

दिंडी मार्गावर गावकऱ्यांनी आकर्षक रांगोळ्या काढून कळसांचे पूजन करून स्वागत केले. रंगीबेरंगी रांगोळ्या आणि फटाक्यांच्या आतषबाजीमुळे उत्सवात अधिक रंगत आली. काल सकाळी सूर्योदयापूर्वी दत्त आश्रम सांगवी येथील समाधान महाराज यांच्याहस्ते कळसारोहण झाले. . या सोहळ्यासाठी तामलवाडीतील लेकी माहेरी येऊन सहभागी झाल्याने वातावरण भावनिक झाले. कळसासाठी लेकींकडून आर्थिक सहकार्य करण्याची परंपरा देखील यावेळी जपण्यात आली. याप्रसंगी सुनील पाटील, सुधाकर घोटकर, सिद्धेश्वर मसुते, यशवंत लोंढे, शाहीर गायकवाड, भाऊसाहेब पाटील, नागनाथ मसुते, शिवदास पाटील, सुधीर पाटील, सतीश माळी, कृष्णा घोटकर, संतोष जाधव, भास्कर पाटील, हणमंत गवळी, रामदास गायकवाड, नागनाथ पाटील, सुदर्शन पाटील यांच्यासह गावातील सर्व महिला व गावकरी उपस्थित होते.

लेकींचा उत्स्फूर्त सहभाग ठरला वैशिष्ट्य तामलवाडीतील कळसारोहण दिंडीत लेकींचा उत्स्फूर्त सहभाग विशेष ठरला. तब्बल ७६ लेकींनी कळस वाहत परंपरेला उजाळा दिला, तर सुमारे ६५० महिलांनी कलश घेऊन सहभाग घेतला. सर्वांनी एकसारखी साडी परिधान केल्यामुळे दिंडीमध्ये एकसंधता दिसून आली. माहेरच्या ओढीने अनेक लेकी गावात परतल्या होत्या. नातेवाईकांची भेट, स्नेहसंमेलन आणि धार्मिक वातावरण यामुळे हा सोहळा त्यांच्यासाठी अविस्मरणीय ठरला. लेकींकडून कळसासाठी आर्थिक सहकार्य करण्याची परंपरा देखील जपण्यात आली

# रामेश्वर (रुई) येथे भक्तिमय उत्साहाच्या वातावरणात प्रभू श्रीराम जन्मसोहळा आणि श्रीराम रथ उत्सव संपन्न

## दुष्ट शक्तीचा नाश व धर्म रक्षणासाठी प्रभू रामाचा जन्म - दिवेगावकर महाराज

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले भारतीय संस्कृती दर्शन श्रीराम रथ यात्रा सोहळा रामनवमी गुरुवार रोजी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तिमय वातावरणात लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रूई) येथे पार पडला. या सोहळ्यास रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते.

प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी सकाळी पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन- श्रीराम रथाची, रामेश्वर गावत ग्रामप्रदक्षिणा झाली. या रथयात्रेत वाजंत्रीसह विविध भजनी मंडळी, टाळकरी, असंख्य भव्य ध्वज हातात घेऊन प्रभू रामचंद्राचा जयघोष करीत भाविक भक्त सहभागी झाले होते. मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीवातावरणात निघालेल्या या रथयात्रेत महिला पुरुष सर्व स्तरातील नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

या रथ यात्रेचा समारोप प्रभू श्रीराम मंदिरात झाला याप्रसंगी ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून बोलताना हरिहर महाराज यांनी प्रभू श्रीराम हे विष्णूचा सातवा अवतार होते. प्रभू रामाचे ईश्वर म्हणजेच रामेश्वर असल्याचे सांगून त्रितायुगात दुष्टशक्तीचा नाश करण्यासाठी आणि धर्मरक्षण करण्यासाठी मानवाला सन्मार्गावर आणण्यासाठी जन्म झाला. प्रभू श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम असून त्यांचे जीवन सत्य, त्याग, कर्तव्य, एक वचनी, एक पत्नी असा नैतिक मूल्याचा आदर्श आहे असे त्यांनी बोलून दाखवले.

ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. श्रीराम रथ यात्रा सोहळ्यास रामेश्वर येथील ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, प्रतिष्ठित शेतकरी काशीरामनाना कराड, माइर्स पुणे एमआयटीचे मंगेशबापू कराड, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, एमआयटीचे डॉ. हनुमंत कराड, बालासाहेब कराड, संत गोपाळ बुवा



महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, महेंद्र जाधवर, डॉ. सौरभ कराड, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, तेजस कराड, पृथ्वीराज कराड, राजवीर कराड यांच्यासह संपूर्ण कराड परिवाराची प्रमुख उपस्थिती होती. रामेश्वर आणि परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# संविधानिक मूल्ये अंगीकारल्याशिवाय जबाबदार नागरिक घडत नाहीत : डॉ. अशोक नारनवरे



**लातूर/प्रतिनिधी :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' अंतर्गत ''संविधानिक मूल्य आणि जबाबदार नागरिक'' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान पार पडले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. अशोक नारनवरे (मराठी विभाग, मास्टर दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी) यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ''भारतीय संविधानाने प्रत्येक सामान्य नागरिकाला केवळ अधिकारच दिले नाहीत, तर त्यासोबत जबाबदाऱ्यांची जाणीवही दिली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, समानता आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्ये समाजव्यवस्थेचा पाया आहेत. 'स्व' ऐवजी 'आपण' ही भावना अंगीकारल्याशिवाय राष्ट्राची एकता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा टिकू शकत नाही.''

ते पुढे म्हणाले, ''संविधानिक मूल्यांचे पालन केल्यास समाजात सौहार्द, न्याय आणि समतेचे वातावरण निर्माण होते. युवकांनी संविधानाचा सखोल अभ्यास करून त्यातील मूल्ये आपल्या आचार-विचारात उतरवली पाहिजेत. तेव्हाच खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक घडू शकतील.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. हरिश्चंद्र चौधरी (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर) म्हणाले की, ''विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये केवळ अभ्यासापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे. संविधानाचे ज्ञान हे केवळ परीक्षेसाठी नसून ते भविष्य घडविण्याचे प्रभावी साधन आहे.''ते पुढे म्हणाले, ''संविधानाची जाणीव असलेला युवकच समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संविधानाच्या तत्वांचा आदर राखत जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडावी.'' या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांविषयी जागरूकता निर्माण होऊन जबाबदार नागरिकत्वाची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# डिझेल-खतांपाठोपाठ आता 'पंप संच'ही महागणार

**धाराशिव/प्रतिनिधी :** धाराशिव : आधीच निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करणाऱ्या मराठवाड्यातील आणि विशेषतः धाराशिव जिल्ह्यासारख्या दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यासमोर आता नवे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. कच्च्या मालाच्या, विशेषतः धातूंच्या किमतीत जागतिक स्तरावर होत असलेल्या सततच्या बदलांमुळे शेतीसाठी लागणाऱ्या 'पंप संचांच्या' किमतीत ७.५ ते १० टक्क्यांनी वाढ होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे बळीराजाच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. पीव्हीसी पाईपनंतर आता डिझेल-खतांपाठोपाठ 'पंप संच'ही महागणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या बळीराजाचे वाढत्या खर्चाचे गणित कोलमडणार आहे. 'दक्षिण भारत इंजिनीअरिंग मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन'ने दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल महिन्यापासून या दरवाढीची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. मागील वर्षभरात तांब्याच्या किंमतीत ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. प्रति किलो ९०० ते ९५० रुपये असलेले तांबे आता १२०० रुपयांच्या घरात पोहोचले आहे. पंप संचाच्या एकूण उत्पादन खर्चामध्ये तांब्याचा वाटा २५ ते ३० टक्के असतो. याशिवाय ल्युमिनियम, पोलाद आणि कास्ट आर्यनच्या किमतीतही मोठी वाढ झाल्याने पंप उत्पादक कंपन्यांना ही दरवाढ करणे भाग पडत आहे.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

# ऑपरेशन शोध-III मोहिमेत लातूर पोलिसांची प्रभावी कामगिरी

## १५० महिला व बालकांचा शोध - सुरक्षित पुनर्वसनास प्राधान्य

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वतीने दिनांक ०६ मार्च २०२६ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांचे निर्देश व सूचनेवरून अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री भालचंद्र तिडके आणि त्यांच्या टीमने संपूर्ण जिल्ह्यात ऑपरेशन शोध-खखख ही विशेष मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.या मोहिमेचा मुख्य उद्देश अनैतिक मानवी वाहतूक रोखणे, बेपत्ता महिला व बालकांचा शोध घेणे, तसेच संशयित ठिकाणी छापे व तपासणी करून महिला व बालकांचे संरक्षण करणे हा होता.



सदर मोहिमेदरम्यान लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमार्फत समन्वय साधून विविध ठिकाणी शोधमोहीम, तपासणी, छापे व जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. रेल्वे स्थानके, बसस्थानके, हॉटेल्स, लॉज, ढाबे, सार्वजनिक ठिकाणे तसेच संशयित परिसर येथे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षा मार्फत काटेकोर तपासणी केली. यामध्ये सामाजिक संस्था, महिला व बालकल्याण विभाग, तसेच स्थानिक नागरिकांचे सहकार्य देखील घेण्यात आले.

या व्यापक मोहिमेत उल्लेखनीय यश मिळाले असून एकूण १५० महिला व बालकांचा शोध लावण्यात आले आहे. त्यामध्ये १२१ महिला , २३ मुली , आणि ०६ मुले असे एकूण १५० जणांचा शोध लावण्यात यश प्राप्त झाले आहे. शोधण्यात आलेल्या सर्व महिला व बालकांची सखोल पडताळणी करून त्यांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत त्यांच्या कायदेशीर पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ज्या प्रकरणांमध्ये आवश्यक होते, त्या ठिकाणी संबंधितांना पुनर्वसन केंद्रात दाखल करून त्यांच्या सुरक्षिततेची व भविष्यातील संरक्षणाची योग्य काळजी घेण्यात आली आहे.

ऑपरेशन शोध-खखख ही मोहीम केवळ शोधापुरती मर्यादित नसून समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी आणि अनैतिक मानवी वाहतूक रोखण्यासाठी एक प्रभावी पाऊल ठरली आहे. या मोहिमेमुळे अनेक कुटुंबांना त्यांच्या हरवलेल्या सदस्यांचा पुन्हा सहवास मिळाला आहे.लातूर जिल्हा पोलीस दला कडून अशा मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणतीही संशयास्पद हालचाल, मानवी तस्करी संदर्भातील माहिती अथवा बेपत्ता व्यक्तींबाबत माहिती असल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. नागरिकांच्या सहकार्यामुळेच अशा मोहिमा अधिक प्रभावीपणे यशस्वी होऊ शकतात.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649